# **कॉम्रेड कुंभकर्ण***

मूळ इंग्रजी लेखकः रामू रामनाथन
मराठी अनुवादः ओंकार गोवर्धन

अरूण फरेरा, श्रीधर श्रीनिवासन, व्हरनॉन गोन्साल्वीस आणि के. डी. राव यांच्या मुक्ततेसाठी...

**प्रसंग १**

**नाटकातला पहिला प्रसंग.**

**संगीत.**

**सर्व नट येतात. घंटा वाजवतात. प्रेक्षकांना दंडवत घालतात. मग स्टेजचा पडदा वर करतात.**

**कोरसः** **(चालः शिट्टी वाजली गाडी सुटली)**

घंटा वाजली
लोकं जमली
पडदा ग्येला वर
करतो नाटक आता सादर
आन् तुमी करून घ्या साजरं ‖धृ‖
करकरा दात खायाला
आन् पावलं वाजवायाला
आवतान तुमाला
त्येल आगीत ओतायाला
कोन शिंकतो?
त्यो कोन खोकतो?
करा बंद आता बडबड ‖धृ‖
ना पयल्या अंकाला
ना दुसऱ्या अंकाला
आवतान तुमाला
डायरेक्ट

* हाकारा । hākārā या मराठी आणि इंग्रजीतून प्रकाशित होणाऱ्या ऑनलाईन नियतकालिकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये (जानेवारी २०१८) कॉम्रेड कुंभकर्ण या नाटकाचे मराठी भाषांतर प्रकाशित झाले आहे. मराठी नाटकाच्या परवानगीसाठी भाषांतरकाराची परवानगी आवश्यक. परवानगीसाठी ओंकार गोवर्धन यांच्याशी govardhanomkar30@gmail.com या इ-मेलव्दारे संपर्क साधावा.

तिसऱ्या अंकाला
सबुद घावना
अन् गानी जमना
पयल्या दुसऱ्यात हाय गडबड
करतो तिसरा अंक सादर
आन् तुमी करून घ्या साजरं ॥धृ॥

**एकजणः** तर जमली सगळी पब्लिक?

**कोरसः** व्हय महाराजा !

**एकजणः** सुरू करायचं का?

**कोरसः** व्हय महाराजा !

**एकजणः** आजच्या नाटकाचं नाव काय?

**कोरसः** काय महाराजा?

**एकजणः** कॉम्रेड कुंभकर्ण.

**कोरसः** काय महाराजा?

**एकजणः** व्हय महाराजा ! कॉम्रेड कुंभकर्ण, कॉम्रेड कुंभकर्ण, कॉम्रेड कुंभकर्ण. हे हाय आजच्या नाटकाचं नाव. आकर्षक न्हाई मान्य. पर मोठ्या मनानी करा माफ. नाटक बगा, न्हाई आवडलं तर करा मग संताप.

**कोरसः** हां महाराजा !

**एकजणः** तर सुरू करतो.
ना ऐषोरामी सेट ना थाट माट
ना पहिल्या नजरेत प्रेमात पडणं
सुरूवातीपासून ते थेट शेवटापर्यंत
फक्त आणि फक्त
कॉम्रेड कुंभकर्ण, कॉम्रेड कुंभकर्ण, कॉम्रेड कुंभकर्ण

**शंखध्वनी.**

**प्रसंग २**

**‘नाटकातील नाटक’ पद्धतीने सादरीकरण पुढे जाते. एक नट बोलू लागतो.**

**[विराम.]**

**नटः** माजा बाबा म्येला.

तितं त्याचं प्रेत पुरलं हाय.

प्रेत उकरून काढायलेत ते.

बाबा क्रांतिकारक व्हता असं ते म्हन्तायत.

त्यांच्याजवळ तशे पुरावे हायेत असंबी म्हन्तायेत ते.

क्रांतिकारक म्हंजी काय त्ये मला न्हाई म्हाईत.

बाबाच्या प्रेताला घान सुटल्याली.

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या क्येली) मला गजरा द्येती. म्या मोगरीचा भरभरून वास घ्येतो. बाबाच्या प्रेताला सुटल्याली घान यकदम गायब व्हते.

लहान असताना मी अन् माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या क्येली) आमी जमिनीत बिया पेरायचो.
ती म्हनायची, “आपन पैशाचं झाड लाऊ. म्हंजे मग आपन कधीच गरीब व्हनार न्हाई.”

कधीमधी पैशे असले तर ती दहा पैशाची नाणी जमिनीत पेरायची..

दुसऱ्या दिवशी आमी सकाळी लवकर उठायचो अन् पैशाचं झाड आलंय का त्ये पाह्यचो.

पन आमी कदीच श्रीमंत न्हाई झालो.

बाबा म्हनायचा, “तुमी अशे गरीबच रहानार. आर्य लोक तुमाला कदीच श्रीमंत होऊ द्येनार न्हाईत.”

आई म्हणायची, “उगा न्हाई तो भुसा पोरांच्या डोक्यात भरू नगंस. आर्य अन् द्रविड! मूर्खपना निस्ता!”

बाबा म्हनायचा, “खरं काय हाय त्ये कळू दे की त्यान्ला. ष्टेजवर नाचकाम अन् माकडचेष्टा करन्याप्येक्षा बरं ते.”

आई चिडायची. म्हनायची, “नाटकात काय वाईट हाय?”

बाबा म्हनायचा, “तुज्या आयुष्यापेक्षा जास्त उजेड तुज्या नाटकात आसतोय. नाटकं करतात साले! ष्टेजवर मस दिवेबिवे टांगून. हितं अजूनबी झोपडपट्ट्या अंधारात हायेत. अन् ह्ये वाईट हाय. कळलं?”

दरवेळी या वाक्यानंतर आय बाबाला मारायला सुरुवात करायची.

आईनं मारायला सुरुवात क्येली की बाबा धूम ठोकायचा. तशी रीतच पडून ग्येली व्हती.

एक दीस म्या बाबाच्या मागंमागं ग्येलो.

येक जिना धाडधाड चडून बाबा गच्चीवर ग्येला. खाली येक छापखाना व्हता. बाबा तिथनं पुस्तकं
घ्यायचा अन् रेल्वेठेसनावर जाऊन ती चार आठ आन्याला इकायाचा.

म्या बाबाला मदत करायला सुरुवात क्येली.

तो म्हनालाः “नाटकात नाचन्याप्येक्षा ह्ये बरं. न्हाई का?”

म्या म्हनालोः “हां.”

तो म्हनालाः “ह्ये कुटलं पुस्तक हाय म्हाईत हाय का?”

म्या म्हनालोः “च्यक्.”

तो म्हनालाः “ ‘रावण काव्यम्’. ही येक ग्रेट कविता हाय.”

म्या म्हनालोः “हां.”

त्यो म्हनालाः “कोनी लिहिली हाय म्हाईत हाय का तुला?”

म्या म्हनालोः “च्यक्.”

त्यो म्हनालाः “पुलावर कुझ्ञानदाई.”

म्या म्हनालोः “हां.”

त्यो म्हनालाः “पेरियार सरांचे शिष्य.”

म्या म्हनालोः “हां.”

त्यो म्हनालाः “पेरियार सर म्हंजे कोन ते माहिताय का तुला?”

म्या म्हनालोः “च्यक्.”

तो म्हनालाः “ल्येका म्हंजी तुला काहीच माहिती न्हाई. अरं राजा, आपल्या द्येशातला सर्वात मोठा मानूस म्हंजी पेरियार सर!”

म्या म्हनालोः “हां.”

तो म्हनालाः “येक दिवस तुला बी पेरियार सरांसारखं व्हायचं हाय ह्ये लक्षात ठीव.

म्या म्हनालोः “हां.”

त्यो म्हनालाः “त्यासाटी तुला लिहावाचायला शिकलं पायजे.”

मी म्हनालोः “हां.”

बरोब्बर दुसऱ्याच दिवशी येक समारंभ व्हता.

त्याला म्या बी ग्येलो व्हतो. ही तोबा गर्दी !

हजारो लोकं तिथं व्हते.

पर समद्यांनी काळे शर्ट घातल्याले.

ष्टेजवर येक दुसरे सर व्हते. त्यांनी येक गानं म्हनलं.

बाकी समद्यांनी पन त्यांच्यासोबत त्ये गानं म्हनलं.

त्ये रावनावरचं गानं व्हतं. सडेतोड,विचारी अन् चांगला रावन! (**हसतो**.) चांगला रावन!

मग मला ष्टेजवर बोलावलं.

अन् मला काळा शर्ट दिला !

सर म्हनालेः “शाळेत जायचं. काय?”

म्या रावनाच्या फोटूला नमस्कार क्येला.

मला लय आनंद झाला.

आयुष्यात पयल्यांदा म्या शर्ट घातला व्हता.

मी अन् बाबा मग मंडईत ग्येलो.

लय गर्दी व्हती तितं.

मग आमी यका कोबीच्या ट्रकावर चढलो अन् घरी आलो. ट्रकनी. मज्जाच मज्जा!

घरी आलो तवा आय लय चिडली व्हती.

आई म्हनालीः “ह्यानं काळा शर्ट का घातलाय?”

बाबा म्हनालाः “त्यो त्याला भेट म्हनून मिळाला हाय.”

आई म्हनालीः “तुजं राजकारन त्याच्या डोक्यात घालून त्याला बिघडवू नको सांगून ठीवते.”

बाबा म्हनालाः “असं म्या कायबी क्येल्यालं न्हाई. अन् ह्ये राजकारन न्हाई गं. ही स्वाभिमानाची लढाई हाय.”

आई म्हनालीः “तुला कोबीचा वास का येतोय?”

बाबा म्हनालाः “त्यानं आज खूप कोबी, कोबीच कोबी खाल्ला. व्हय की न्हाय रं?”

आई म्हनालीः “असं व्हय?”

असं म्हनून आईनं बाबाच्या डोक्यात सनसनीत बुक्का मारला. इतका भारी की बाबाचा म्येन्दूच भाईर आला! मग आई वराडली, “तो म्येंदू डोक्यात जागच्या जागी ठीव. तू या जगात, हितं रहातोस. पृथ्वीवर. ईसरलास का? हितं जगताना मूर्ख मानसालाबी म्येंदू

वापरावा लागतो ! तुजं त्ये राजकारन ताबडतोब बंद कर. ताबडतोब. कायबी मिळायचं न्हाई त्यातनं? तुला कळत न्हाई का तुज्या डोस्क्यातले दगडधोंडे नको हायेत आम्हाला. आमाला खायला हवंय प्वाटाला. कळत न्हाई तुला?"

असं म्हनून मग आय दुसऱ्या खोलीत ग्येली. येक कोंबडी घीऊन आली. कोंबडी? ती तिनी चोरून आनली व्हती. "सोला. कोंबडी करते आज जेवाया." ती म्हनाली. वा!

मग आमी सगळे यकत्र जेवलो. शेवटचे.

मला अजून त्यो दिवस आठवतो.

माज्या आज्याची पुण्यतिथ व्हती.

बाबानं भाषन बी क्येलं.

बाबा म्हनालाः "याच दिवशी अन्ना सर ग्येले. १५ लाख लोकं त्यांच्या प्रेतयात्रेला हजर व्हती. तुजा आजाबी व्हता त्यात. जनता एक्स्प्रेसच्या टपावर बसून चालला व्हता. खाली पडून म्येला."

मला बाबाची लय आटवन येती.

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या केली.) मला म्हनायचीः "नगं आटवन काढूस त्येची. कुनाची बी आटवन काढन्यात काही अर्थच उरल्याला न्हाई हल्ली."

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या केली.) असं बी म्हनाली की, "अन् कशावरून त्योच तुजा बाप व्हता?"

म्या म्हनालोः "काय?"

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या केली.) म्हनालीः "तुला न्हाई म्हाईत? आपल्या नाटक कंपनीतली काही जन स्वताच स्वताचे बाप हायेत. आता बोल!

मोटा व्हत असताना म्या लय बेचैन व्हतो. मला वाटायचं माजं आयुष्य लय जोरात धावतंय. म्या दररोज माज्या वयाच्या चौपट मोटा व्हतोय असं वाटायचं माला. माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या केली.) म्हनायची, “ह्ये असंच चालू ऱ्हायलं तर जवा तू पाच वर्सांचा व्हशील तवा तुजं वय १३६४ वर्स असंल.”

ह्ये म्हंजी लयच म्हातारं झालं!

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या केली.) म्हनायची, “अशानं तुला कोन पोरगी द्येनार?”
म्या जवाजवा जुन्या गोष्टींचा ईचार करतो तवा मला लय आटवनी येत्यात.
हं...

आमची आय म्हनायचीः “या द्येशात पर्त्येकाच्या डोक्यात आपापल्या आटवनींचे फोटू हायेत. फकस्त काही जनांची रीळ गायब हाय.”

माला अमर व्हायचं हाय. आत्तापर्यंत तर म्या बरोबर जमवलेलं हाय.

म्या येक लाख वर्षांचा हाय. (हसतो.)

काल रात्री काही दारूडी मानसं आली. त्यांना माज्या आईबरूबर अन् कंपनीतल्या बाकीच्या पोरींबरूबर झोपायचं व्हतं. माला जाग आली तवा त्ये मोठमोठ्यांदा वरडत व्हते. त्ये म्हनाले, “डुकराहो, फिरती नाटक मंडळी हाय न्हवं तुमची?” म्या म्हनालो, “व्हय.” तर त्ये म्हनाले, “मग सुक्काळीच्याहो, आत्ता तुमी यका जाग्यावर कशे?” म्या म्हनालो, “आमी काय नुसतंच फिरत न्हाई. नाटक बी करतो.”
त्ये म्हनाले आमी खोटारडे हाय. सगळे नाटके खोटारडे असतात असंबी म्हनाले त्ये.

मला जर खोटं बोलावसं वाटलं तर म्या लेखक हुईन. सगळ्यात छान खोटं बोलनारा प्रानी म्हंजी ल्येखक.

माज्याकडं खूप थापा पायजे हायेत मला. मग त्या सगळ्या थापा हितंतितं प्रवास करताना मला वाटेत प्येरत प्येरत जाता यील.

एकदा आमी अशेच चाललो होतो.

याच येळेला माज्या जुळ्या बहिणीनं आत्महत्या केली.

ट्रकसाटी ठीवलेलं डीजेल पिऊन.

तिनं चिट्ठी बी लिहिली, पन न दिसनाऱ्या शाईत.

आमी लय दुःखात व्हतो. तवा आमाला दुःखातून भायेर काढण्यासाटी आमच्या म्यानेजरनी मोठी मेजवानी दिली. त्येनं जेवायला भात क्येला व्हता. तो म्हनाला, भात क्येला तर पर्त्येकाला ३४२५ शितं मिळत्यान अन् चपात्या क्येल्या तर फकस्त २ चपात्या मिळत्यान. २ विरुद्द ३४२५.

मंग भातच जिंकला अन् आमी समद्यांनी भात खाल्ला.

त्या रात्री आमी अंधारात प्रवास क्येला.

“अंधाराचा वेग काय असतुया?” म्या आयला ईचारलं.

आईनं माज्याकरता येक पवाडा म्हनला.
हं....

आईचा आवाज आताशा काम द्येत न्हाई.

ती गात व्हती तवा आमी येक नदी वलांडली. तवा पोलिसांनी ईचारलं, “बरूबर बंदुका घीऊन चाललात का रं नाच्यांनो?” आमच्यातला कोनीतरी वराडला, “काहून? तुमच्या पळवून न्येल्या काय त्यांनी?”

मोठीच चूक झाली. घोड्यायवडी मोठी चूक.

अन् म्हनतात ना, चुकीचं बोल्यालं बहिऱ्याला बी ऐकू जातं.
आमाला अटक झाली अन् मारहान बी झाली.

ती यक छोटी कोठडी व्हती, स्वच्छ बी व्हती, पर मला अजाबात तितं रहायचं न्हवतं. तरीबी तितं आमी तीन म्हय्ने व्हतो.

जेवनाचा पत्या न्हाई.

त्ये म्हनाले दररोज जेवनानं अपचन व्हील.

आय म्हनाली, "थू भडव्याहो! तुमा श्रीमंत लोकाला इतकं खायाला मिळतंय का त्ये पचना झालंय अन् आमा भुकेल्याला तर गू बी पचतो हितं नालायकाहो!"

माजी आय खरंच लय झुंजार व्हती. तिनी कोनाचे उधार घ्येतलेले पैशे कदीबी परत क्येले न्हाईत.

ती म्हनायची, "म्या लय काबाडकष्ट करून पैशे मिळवते, म्या ते कोनाला द्यायची न्हाई. ज्याला कोनाला हवं असतीन त्यानं हज्जारदा माज्याकडं मागावं."

'लाजेप्येक्षा मला पैका हवा' असं तिचं साधं म्हणनं व्हतं.

तिनं ह्येच माज्या जुळ्या बहिनीला बी सांगून पाह्यलं.

आय तिला म्हनाली, "ह्ये बग बाई, पुरषाला बाईकडून तीन गोष्टी पायजे असतात. अन्न, बिछाना अन् शांतता. त्यामुळं त्याला खाऊ घालावा , उरावर घ्यावा अन् मग गपगुमान झाडाखाली तंबाखू खात बसावं. समजलं का?"

माज्या जुळ्या बहिनीला काय ह्ये पटलं न्हाय. ती म्हनाली, "अन् मग जगावं कदी गं?"

**(निःश्वास)**

सगळेजन माज्या जुळ्या बहिनीला इसरलेत.

आत्ता सगळेजन नव्या नाटकाच्या तालमीत गुंग हायेत.

म्यानेजर मला म्हनतो, "ल्येका..उद्याच्याला यकदम जोरात झालं पाह्यजे. रंगला पायजे खेळ"

कसा?

निम्म्याहून जास्त नट ब्येकार हायेत.

हं..

सालं नाटकामुळं कलेचं नाव लय खराब व्हतं.

कुटंबी जावा नाटकाचे दोनच प्रकारः लोकं ज्याला जातात त्ये नाटक अन् लोकं ज्याला जायची त्ये नाटक.

आमचा म्यानेजर अंधारात माज्या जुळ्या बहिनीच्या अंगचटीला आला. त्याला झिडकारताना माज्या बहिनीनं जी ॲक्टींग क्येली! लय भारी. माजी जुळी बहीन नंतर हसत व्हती.

म्या म्हनालो, "अशी जर तू ष्टेजवर हसली तर तुज्यावर पैशाचा पाऊस पडल."

"पैशाइतकं स्वस्त काहीच न्हाई." ती तुच्छतेनी म्हनाली.

ह्येच माज्या जुळ्या बहिनीचे शेवटचे शब्द.

बाबाचे शेवटचे शब्द न्हाईतच.

मला म्हाईत हाय पक्कं.

कारन बाबा म्येला तवा मी हजर व्हतो.

त्या दिवशी मी त्याच्याबरुबर छापखान्यात ग्येलो व्हतो.

आमी दोगं गच्चीवर ग्येलो.

तितं काही पुस्तकं व्हती.

माला वाटलं ही ईकायची हायेत.

बाबा म्हनाला, “न्हाई. ही जाळायची हायेत आपल्याला.”

म्या म्हनालो, “का?”

बाबा म्हनाला, “सरांनी सांगितलं हाय.”

म्या म्हनालो, “बरं.”

आमी ती पुस्तकं घीऊन पिकेट ग्राउंडावर ग्येलो.

मग सर आले.

त्यांनी यक भाषन क्येलं. त्ये म्हनाले द्येवाला बाजूला सारा अन् मानुसकीवर लक्ष ठ्येवा. आत्मसन्मानाचा तो एकमेव मार्ग हाय असंबी म्हनाले त्ये.

मग आमी मोठी शेकोटी प्येटवली.

अन् एकेक करून त्यात पुस्तकं टाकायला सुरूवात क्येली.

मनुःस्मृती.

पुराण.

सिल्लापद्दीकरम्.

रामायण.

लय मज्जा येत व्हती.

प्रत्येकानं काळा शर्ट घातला व्हता.

प्रत्येक जन घोषणा द्येत व्हता.

अन् अचानक, ध्यानीमनी नसताना, बाबानं त्या शेकोटीत उडी घेतली.

बाबा असं का वागला ?

आज बी मला कळल्यालं न्हाई.

कुनालाच कळल्यालं न्हाई.

आई म्हनती, “मूर्खपना सगळा! मूर्ख मानूस दुसरं काय करनार?”

तवाच त्यांनी माज्या बापाचं प्रेत यका निळ्या रंगाच्या प्लास्टिकमधी गुंडाळलं अन् लांब घीऊन ग्येले.

आईचं बरूबर व्हतं बहुत्येक.

अन् बरोब्बर त्या दिवशी म्या नट झालो.

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या क्येली.) म्हनाली, “तुला दुसरा पर्यायच न्हवता. तुज्या नशिबातच व्हतं ह्ये.”

**कोलाहल, गोंधळ. सर्वांची धांदल.**

**प्रसंग ३**

**पावसाळी, एकाकी रात्र**.

जुळी बहीणः भाईर पाऊस मी म्हनतोय. लय एकटं एकटं वाटतंय. आज बाबाची वर्षतिथ. मागल्या वर्षी अशाच एका रात्री बाबा म्येला. म्या तशी लहान हाय, लय लहान. पर मला अपुरेपन कळतं. अन् तसंबी या जगात काय चाललं हाय त्ये आपल्याला कळतं असं परत्येकाला वाटत असतंच.

आई म्हनतीः “आपल्या नाटक कंपनीचे जुने दीस परत येतीन.”

कशे? त्ये न्हाई मला कळत. थमिअरपरनि, काल्लापट्टी, कोडीयानाकुलाम, मालेवालुलू . केवढे दंगे अन् खून झाले. आमच्या विहीरींमधी पन त्यांनी विष टाकलं.

आई म्हनतीः “पन त्यांनी जिल्ह्याचं नाव बदललं न्हाई का? आपल्या न्येत्याचं नाव दिलं की  जिल्ह्याला!”

म्या तिला बजावलंः “आये, मागच्या आरशातून बगू नगंस.”

आई तरीबी म्हनतीः “न्हाई न्हाई, तू बघ्शीन काही दिसातच आपले चांगले दिस सोताच्या पायानं आपल्या दारी येतीन. बघ्शीनच तू.”

वा.

पर आईला ह्ये म्हाईत न्हाई का इतिहास नावाचा प्रानी येगळाच अस्तु. त्येला रांगनं ठावं नसतंय. त्यो उड्डानं घ्येतो. मोठमोठी उड्डानं.

आज, असलाच एक दिवस हाय.

आत्ता ह्ये सगळं खुळ्यागत वाटल.

पर काही वर्षांनी आपल्यातलंच वाटल.

आजची रात बी तशीच. इतिहासाला उड्डानं घ्यायला लावनारी.

आजची खुळी रात.

**[विराम]**

"आये, तुला बाबा कुटं भ्येटला?" म्या ईचारलं.

आई म्हनालीः "नाटकाच्या ख्येळाला. म्या देवी शीतेचं काम करीत व्हते. पयल्यांदाच. म्या माज्या बाबाची वाट बघत व्हते."

अन् माजाच बाबा आला.

आई म्हनालीः "तुज्या बापानं मला माज्या बापाला अटक झाल्याची बातमी सांगितली. म्येला आला तोच वाईट बातमी घीऊन."

"पर आज्याला अटक का झाली? त्यो वाईट माणूस व्हता का?" म्या ईचारलं.

आई म्हणालीः " न्हाई मला ठाव. मला त्ये राजकारन बीजकारन न्हाई कळत."

**मी(नट):** आई माला लागली भूक

खायाला द्ये माला खूप खूप खूप

**जुळी बहीण**: खरं काय त्ये मला मागून कळलं. तीरकमठा अन् बंदुका घीऊन आजा राक्षसाचे विचार पसरवतो अन् हिंसेला खतपाणी घालतो असा पोलीसांचा आज्यावर आरोप व्हता.

**मी (नट):** आई माला लागली भूक
खायाला द्ये माला खूप खूप खूप

**जुळी बहीण**: आजा ज्येलात ग्येला. ज्येलात त्याच्यावर हल्ला झाला. त्याच्यावर १४ गोळ्या झाडल्या. १३ नंतर भाईर काढल्या. एक गोळी मात्र आजाच्या हृदयात राहिली. ते ती नाय काढू शकले.

**मी (नट):** आई माला लागली भूक
म्या या गोळ्या खाऊ?

**जुळी बहीण**: आईनं त्या १३ गोळ्या हिसकावून घ्येतल्या. म्हनाली " खबरदार! या माज्या गोळ्या हायेत. माज्या बापाची अन् नवऱ्याची यकुलती येक आठवन हाय ही. ह्यान्ला हात बी लावायचा न्हाई."

द्येवी शीता म्हनून पयल्यांदा आई ष्टेजवर जाणार व्हती. फक्त येक मिनिट राहिलं व्हतं. याच येळला बाबा तिला भ्येटला अन् माज्या आज्यातून भायेर काढलेल्या १३ गोळ्या बापानं आईला दिल्या.
मग आई हसत म्हणाली: "अशी आमची पहिली भ्येट. पयल्यांदा द्येवी सीतेचं काम. नाटक करताना पूर्ण येळ त्या १३ गोळ्या मुठीत व्हत्या."

**(ढगांचा गडगडाट आणि वादळ.)**

**मी(नट):** आई माला लागली भूक
खायाला द्ये माला खूप खूप खूप.

**आईः** शू.....आयका पोरांनो
आजचा दिसच हाय लय दुख्खी

अन् त्यात पावसाचा मार खाऊन भायेर झाडं बी झालीत मुकी.
आज रामाच्या द्येवळात जायला नगं.
वादळ अन् पाऊस डोक्यावर घीऊन जावं कसं?
बसा. म्या तरी काय बोलू? पर जरा शांत बसा.
दाटून आलेला जरा कोरडा करू घसा.

**जुळी बहीणः** मग आता काय करावं गं?
यखादी गोष्ट तरी सांग आम्हास्नी.

**आईः** हां.
मी सांगत्ये तुम्हाला रामायनातली गोष्ट
माज्या आजीनं मला सांगितली व्हती तशी.
ही गोष्ट निस्ती गोष्ट न्हाई पोरांनो
यात हायेत नाच अन् गानी
कुठली गोष्ट आयकायाची तुम्हाला
त्ये हळूच सांगा माज्या..... डाव्या कानी.

**जुळी बहीणः** आमाला नगं रामायन
आमाला हवी हाय कुंभकर्नाची गोष्ट.

**आईः** कुंभकर्न? त्येच्याहून कितीतरी चांगली मानसं हायत की रामायनात. तेंची भजनं म्या म्हनून दाखवते की. त्या झोपाळू राक्षसाची गोष्ट काय म्हनून?

**जुळी बहीणः** हितं माज्या भावाला असुर आवडाया लागलाय. राक्षसासारखं हावभाव शिकायचं म्हनतंय त्ये.

**(आई घसा साफ करते.)**

**आई :** हं.
ठीकाय तर मग.
अगदी सुरुवातीपासून सुरू करू.

आता सुरू होतंय शिवतांडवनृत्य.

**(थोडे संगीत वाजते.)**

**आईः** रामायन ह्ये मोठं खास. पुराणातली सगळी
शिकवन मिळती रामायनात.
रामायनाच्या सुरूवातीला हाय एक गोष्ट
ना गंमत ना हानामारी हाय यकदम स्पष्ट.
यकदा येक भूद्येव म्हन्जीच बामन ग्येला अगस्त्य हृषिकडं.
म्हणाला “ऋषीराज, मोक्षप्राप्तीसाठी मी कोणती साधना करावी?”

**जुळी बहीणः** मंग काय म्हनाला अगस्त्य?

**आईः** यावर अगस्त्य ऋषीनी त्याला येक गोष्ट सांगितली. कारुण्य अन् अग्निवेशाची. त्या गोष्टीत व्हत्या अप्सरा, एक राजा आन् साक्षात देवराज इंद्र. ती गोष्ट अशी हाय की..

**जुळी बहीणः** ती गोष्ट नको आम्हाला.

**आईः** ऐक तर खरी. असं म्हनतात का लय लय लय वर्षांपूर्वी येक राजा व्हता. अरीष्टनेमी नावाचा. राज्य चालवून येक दिवस ह्यो राजा थकला. त्येनं आपलं राज्य मुलाच्या स्वाधीन क्येलं अन् स्वता तप करत बसला. आता त्येचं प्रखर तप बगून इंद्राला वाटली भीती. त्येला वाटलं का या राजाला स्वर्गातच बोलावून घ्यावा. म्हनून मग अरीष्टनेमी राजाला आनायला त्यानं स्वर्गातून पृथ्वीवर अप्सरा पाठवल्या. किती? सात! पन राजा व्हता लय खट. त्यो म्हनाला, “म्या असा तसा यायचो न्हाय. मला तुमी काय स्वर्गीय वागनूक द्येनार त्ये सांगा आधी, मंगच म्या येतो तुमच्यासंगं.”

**जुळी बहीणः** स्वर्गीय वागनूक? आपल्याला तर माहितबी न्हाय.

**आईः** जवा त्याला स्वर्गीय वागनूक कळली तवा राजा चिडला अन् स्वर्गात यायाला न्हाई म्हनाला.

आता देवराज इंद्र चिडला, भडकला अन् घनघोर  काळजीत पडला. आपलं राजपद कसं वाचवावं  असा प्रश्न त्येला पडला. मग, खूप ईचार करून इंद्रानं अरीष्टनेमी राजाला वाल्मिकीकडं पाठवला अन् सवताचा प्रश्न मिटवला.

**मी:** आई माला लागली भूक
वांगीच वांगी हायेत पुराणात खूप.
ती मी खाऊ का?

**आई:** गप रे. अजून कितीतरी हाय सांगायचं अन् तुमालाबी हाय झोपायचं.
तवा ऐका. काय सांगत व्हते मी?
हां, तर वाल्मिकीच्या झोपडीत असताना येका रात्री राजानं वाल्मिकीला मोक्षाबद्दल ईचारलं.
राजा म्हणाला "हे ह्षिराज, मी मोक्ष कसा प्राप्त करावा?"
यावर वाल्मिकीनं त्याला थांबवला अन् रामायनातला एक संवाद ऐकीवला.
रामाच्या गोष्टी वाल्मिकीनं ऐकल्या व्हत्या संतश्रेष्ठ नारदाकडून.
त्या गोष्टीवरून वाल्मिकीनं रामायनाताली पहिली कविता रचली.
अन् हितं सुरू झालं रामायन.

**[विराम.]**

**आई:** अन् तेवड्यात तितं आला ब्रह्मद्येव.
त्यो म्हनाला, "हे थोर संन्याश्या थांब.
अजाणतेपणी आत्ता तुझ्याकडून काव्यनिर्मिती झाली. तथास्तु.
हे काव्यचरण यापुढं अमर होतील. तथास्तु.
मी, देवाधिदेव ब्रह्मदेव तुला आज्ञा करतो
हे वाल्मिकी, आता संपूर्ण काव्य लिहून रामाच्या काळाचा अन् कार्याचा उत्सव साजरा कर. तथास्तु.

**जुळी बहीण:** हां, म्हनूनच तर रामायनात रामाच्या स्तुतीबिगर कायबी न्हाई. आये, मागल्या दसऱ्याला त्येंनी रामाचा पुतळा भर रस्त्यात ठीऊन आपल्यावर कसा हल्ला केलता ना? हजारो सोडावॉटरच्या बाटल्या मारल्या आपल्यावर फेकून.

**आईः** अगं ए भवाने, काय म्हनून मधी मधी बोलतीस? स्वताला कोन समजतीस गं?

**जुळी बहीणः** कोन न्हाय कोन न्हाय. म्या तर ह्येची जुळी बहीन हाय फकस्त. आन ह्यो..ह्यो..ह्यो कुंभकर्ण हाय !

**(पुढील संवाद अतिनाट्य पद्धतीने होतात.)**

**मीः** व्हय. व्हय माते म्या कुंभकर्ण. इंद्रजयी अन् मृत्युंजयी कुंभकर्ण. तुजा पामर भक्त कुंभकर्ण.

**आईः** हा हा हा ! तू कुंभकर्ण असशीन तर मी द्येवाधिदेव ब्रह्मद्येव हाये.

**मीः** ह्ये ब्रह्मद्येवा, माजा तुला परनाम असो.

**आईः** हं. कुंभकर्णा म्या तुजं नाव ऐकल्यालं हाय. अन् तुजे अपराध बी माज्या कानावर आलेले हाईत. गंधर्वांचं, विद्याधारांचं, द्येवांचं अन् ऋषींचं अगणित नुकसान तू केल्येलं हायेस. अन् ह्ये कुंभकर्णा, खादाडा, मी निर्माण क्येलेले प्राणी अधाशीपनानं जर असाच खात राह्यलास तर या भूतलावर प्राणीच उरणार न्हाईत.

**मीः** न्हाई द्येवा. ह्ये खरं न्हाई. यावर नका ईश्वास ठीऊ.

**आईः** अरे कुंभकर्ना, ल्येका, तू तुज्या जन्माच्या येळेला १००० सेविका अन् सुईणी गिळून टाकल्या व्हत्यास यावर जर माजा ईश्वास बसू शकतो तर मग माजा कशावरही ईश्वास बसू शकतो.

**मीः** ह्ये निर्माणकर्त्या ईश्वरा, मग आता तू काय करणार हाईस ?

**आईः** हा हा हा.. म्या तुला तीन वर देणार हाये. त्यातला एक तू निवडायचास.

**मीः** तीन वर? द्येवा नक्की ना?

**आईः** त्रिवार नक्की. शंकाच नको. ऐक माझी आकाशवाणी. पहिला वरः रामायन सोडून इतर कुठल्याबी महाकाव्यात स्वताची बदली करून घे.

दुसरा वरः तुला रामानं ईन्द्राच्या साथीनं मारला का लक्ष्मुमनानं ब्रह्मास्त्राच्यासाथीनं ह्याचा खळबळजनक खुलासा करणारा अर्ध्या मिनिटाचा माहितीपट बग. तेचं नाव "नक्की कोणी मारला?"

अन् तिसरा वरः नित्यत्व.

**मीः** कबूल कबूल. म्या तिसरा वर मागतो द्येवा!

**आईः** कंचा?

**मीः** अं अं अं ......नि....हां ! निद्रत्व.

**आईः** ठीकाय तर मग हे राक्षसा, तू इथून पुढं झोपून जाशील. काळझोप, मुडद्यासारखी झोप लागंल तुला. तथास्तु.

**मीः** अर्रर द्येवा चुकलो मी...मला नित्यत्व म्हनायचं...

**आईः** अन् जोवर पर्वत, महासागर, प्राणी, पक्षी या भूतलावर हायेत तोवर माजी कीर्ती गायली जाईल. तथास्तु.

**मीः** आई मला लागली भूक
खायाला द्ये मला खूप खूप खूप.

**(मी झोपी जातो.**
**आई अन् जुळी बहीण एकमेकींकडे पहातात.)**

**आईः** रामाचीच किर्पा. झोपला यकदाचा.

**जुळी बहीणः** **(निश्वास सोडते.)**
ही गोष्ट सांगनं अवघड व्हत चाललंय दिसेंदिस.

**आईः** का गं माज्या रानी?

**जुळी बहीणः** तुला कळना गं आये. जे दिसतं त्येच फक्त खरं नसतंय.

**आईः** म्हंजी?

**जुळी बहीणः** तू अन् मी काय भाईर येतंय तेवडंच बघतोय. त्ये सगळं कुठं जाणार त्ये आपल्या लक्षात न्हाई येत. माज्या भावाला कुंभकर्न आवडनं धोक्याचं हाय. त्योबी त्याच्या बापासारखा अन् आज्यासारखा अकाली मरंल अशानं.

**आईः** उगा अभद्र बोलू नगंस.

**जुळी बहीणः** आई, त्येचं मरन ठरल्याल हाय. त्याच्या भाग्यातच अकाली म्रित्यू लिवलेला हाय. बग त्येचं कपाळ. वाचता यीना का तुला?

**आईः** कुटं हाय? दाखीव मला.

**जुळी बहीणः** ह्ये बग. काय लिवलंय हितं.. 'इतिहासाला पोकळीचा तिटकारा असतो. सावध रहा. सावध रहा. पौर्णिमेच्या रात्री टाय घालून दोन अनोळखी इसम तुमच्या गावात येतीन. तेंच्यापासून सावध रहा. ही मानसं अतिसामान्य, कमी कुवतीचे सरकारी अधिकारी असतीन. पर त्येच तुमच्या प्रथम वंशजाचा बळी घेतील. सावध रहा, सावध रहा, सावध रहा.'
मरन आपल्या कुटुंबात साथीसारखं पसरलंय आये. आजा रेल्वेच्या टपावर, बाबा शेकोटीत अन् आता हा; माजा भाऊ. लय भीती वाटतीया. आये मला घट्ट जवळ घ्ये.

**आईः** दोन अनोळखी टायवाले? पौर्णिमेच्या राती? कुटं असतीन त्ये?

**अंधार.**

**प्रसंग ४**

**अय्यर आणि नायर प्रवेश करतात.**
**दोघेही टाय घातलेले.**
**झाडाखाली कुंभकर्ण झोपलाय.**

**अय्यरः** जय ओम. जय शंभो. पहा हा पूर्ण चंद्र! पौर्णिमेची रात्र! अहाहा अहाहा! अतिसुंदर अतिसुंदर! पोहोचलो एकदाचे. नायर, लक्षात येतंय ना, आपल्या स्वागतासाठी इथे कोणीही नाही आहे.

**नायरः** (**थकलेला, धापा टाकतोय.**) अन् काय हा उकाडा. छे! घामोळं सुटायची वेळ आली. परमेश्वरा. इतकंच चालायचं होतं तर गोल्फ खेळलेलं काय वाईट? तिथे निदान चेंडूची आशा तरी असते.

**अय्यरः** तुमच्या गोल्फमुळेच आपली रवानगी इथे झालेली आहे. विसरलात का? साहेबांबरोबर खेळताना त्यांच्या ढुंगणावर ती गोल्फची छडी मारलीत. आता भोगा त्याची शिक्षा. सांगत होतो नको म्हणून, ऐकायचं नाव नाही. आता पाठवला साहेबानं वनवासात. पनिशमेंट ट्रान्सफर!

**नायरः** वा वा, काय तो आगाऊपणा! तुम्हाला त्या खेळात नाही गती, म्हणून ही सगळी चिडचिड. माझी गोष्ट, बरंका, जरा वेगळी आहे. सरावानं त्या दांडी आणि चेंडूवर माझा हात बसू लागलेला आहे, अय्यर. परत जाऊ तेव्हा पहालच तुम्ही माझं गोल्फनैपुण्य.

**अय्यरः** वा! हा गोल्फ तरी काय खेळ आहे? आधी तडाखे देऊन चेंडू हरवायचा अन् मग तो शोधात गावभर हिंडायचं. ह्या!

**नायरः** अय्यर .......

**अय्यरः** असो, असो. लेट इट बी.

**नायरः** हं. बरी आठवण झाली.. आपण इथे का  आलेलो आहोत?

**अय्यरः** कुठे?

**नायरः** इथे. कसलाही आगापिछा नसलेल्या या निर्मनुष्य ओसाडीत आपण का आलेलो आहोत?

**अय्यरः** रविवारी घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये १६ पोलीस मारले गेले.

**नायरः** याला जबाबदार कोण?

**अय्यरः** असुर आणि राक्षस. तब्बल २००० गावं त्यांच्या ताब्यात आहेत. गेल्या महिन्यात त्यांनी पाण्यावरून दंगल पेटवली.

**नायरः** पण आपल्याकडे पाईप्स आहेत, आपण टाक्या सुद्धा बांधलेल्या आहेत.

**अय्यरः** सो व्हॉट? त्यांत पाणी नाही.

**नायरः** बट...हे पहा.. हा नकाशा सांगतोय की इथे एक तळ आहे.

**अय्यरः** होय. बरोबर. तळं आहे. गायबैल, कुत्री, डुकरं, आर्य अन् जमीनदार लोकं त्याचा वापर करतात. जेव्हा स्थानिक लोकांनी त्यात आंघोळ करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा हिंसाचार भडकला.

**नायरः** अरेरे! आणि डोंगरापलिकडं सुद्धा एक तळं आहे. त्याचं काय?

**अय्यरः** प्रचंड प्रमाणात मासे असल्याकारणानं ते तळ भाड्यानं देऊन टाकलेलं आहे. यामुळे गेलं वर्षभर संपूर्ण गावानं आंघोळ केलेली नाही. गाव पारोसं आहे. हा दुर्गंध त्याचाच आहे.

**नायरः** ओह, आय सी.आणि दंगल ही त्यामुळेच. पण तात्कालिक कारण काय?

**अय्यरः** एक मूल दगावलं. सामान्यतः हे असुर लोक ढोल बडवून अशी बातमी जाहीर करतात. या वेळेस त्यांना आर्यांनी ढोल वाजवण्यास प्रतिबंध केला. दुसऱ्या दिवशी शेतांतून प्रेत घेऊन जाण्यासही असुरांना मज्जाव करण्यात आला.

**नायरः** का?

**अय्यरः** हे लोकं शेतातला ऊस कापून नेतात अशी तक्रार दाखल झाली होती.

**नायरः** मग पोलिसांनी काय केलं?

**अय्यरः** गावाला घेराव घातला आणि सर्व असुरांची घरं बुलडोझरनं जमीनदोस्त केली. भयानक भयानक! आता पोलिसांच्या हत्या झाल्या. जशास तसे.

**नायरः** असो. पण अय्यर काळजी करू नका. गतं न शोच्यन्ते. आठवतंय ना सीएम साहेब काय म्हणालेत; "घडलेलं सर्व एक वाईट स्वप्न होतं. लवकरात लवकर आपण ते विसरुन जाऊया." केळं?

**[विराम]**

**अय्यरः** (**केळं खातोय**) कुठं येऊन पडलोय देव जाणे. चिटपाखरू नाही इथे. स्वागत समिती वगैरे तर सोडाच. हा बदामाच्या झाडाखाली झोपलेला मूर्ख माणूस सोडला तर भूतं सुद्धा नाहीत इथं च्यायला!

**(कुंभकर्ण घोरतोय.)**

**नायरः** काय विचित्र माणूस आहे. ती रंगीबेरंगी लुंगी बघा. त्यावर पट्टा लावला आहे. आनंद आहे सगळा.

**अय्यरः** हाहाहा ! अहो हा नटाचा कॉश्च्युम आहे. ही हातानं विणलेली शाल. १०१ प्रकारच्या वेगवेगळ्या धाग्यांनी विणलेली आहे.  तो पहा. तो घोट्याभोवतीचा पारंपारिक वाळा, तो छोटा ढोल. हा नटच. शंकाच नको.

**नायरः** हं. आणि ह्याच्या पिशवीत काय आहे? (पिशवी उघडतो.) टॉवेल, टूथब्रश, टाल्कम पावडर, लहान मुलाचा काळा शर्ट, बसचं तिकीट. कुठलं आहे? कडलोरचं. ओके. आणि काय आहे बरं... पत्रकं. पेरीयारांचं आंबेडकरांवरचं भाषण, आंबेडकरांचा फुल्यांवरचा लेख, फुल्यांचं 'गुलामगिरी', ब्राह्मणांची दडपशाही, सही न केलेलं दुष्काळाबद्दलचं पत्रक, हे खडूनं काढलेलं चित्र - यात एक माणूस शेकोटीत उडी मारतोय. १३ वापरलेल्या गोळ्या! आणि एक बिडीबंडल....

**अय्यरः** एक मिनिट.१३ वापरलेल्या गोळ्या? तुम्ही आणि मी एकच विचार करतोय बहुतेक. काय?

**नायरः** हा इसम धोकादायक आहे.

**अय्यरः** नक्की?

**नायरः** अर्थात. अनलॉफुल ॲक्टिविटीज (प्रिवेन्शन) ॲक्ट सेक्शन ४१ हे कायद्याचं कलम आपण अशा धोकादायक माणसांकरताच तर जारी केलंय. असुरा पीपल ग्रुप आणि द राक्षस आर्मी ह्या दोन प्रमुख संघटना आपण याच कायद्यान्वये दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलेल्या आहेत.

**अय्यरः** ओके. मग आता आपलं पुढचं पाऊल काय असणार आहे?

**नायरः** ग्रेहाऊंड फोर्सच्या प्रमुखाशी ताबडतोब संपर्क करू, राज्य पोलीस महासंचालाकाला कॉन्टॅक्ट करू. ग्रेहाऊंड फोर्सला इथे पाचारण करू. लेट्स गेट गोईंग. क्विक.

**[विराम]**

**अय्यर आणि नायरः**

नमस्कार नमस्कार

आपण संकटात आहोत
पण अजिबात चिंता करू नका.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
आम्ही गोळीबार करू
कत्तली करू
खोट्या चकमकी घडवू
काय वाट्टेल ते करू,
आणि तुमचा देश एकसंध अन् सुरक्षित ठेवू.
सर्व मंगल मांगल्ये.

**अय्यर आणि नायर त्यांचा दिनक्रम सुरू करतात. इकडे कुंभकर्णही बोलायला लागतो.**

**प्रसंग ५**

**प्रखर प्रकाश.**
**[विराम.]**

**कुंभकर्णः** काल रात्री आमची नाटक कंपनी घरी परत आली.

पौर्निमा व्हती काल.

जाईचा गंध सगळीकडं नुस्ता भरून ऱ्हायला व्हता.

म्या ट्रकातून खाली उतरलो अन् अचानक हजारो महारोग्यांनी आम्हाला गराडा घातला. नव्या कोऱ्या नाटकाचा पयला ख्येळ. खास महारोग्यांकरता!

यळ कशी बदलती बगा.

आदी आमी अशे खेळ नाय करायचो. तवा आमची चलती व्हती.

ग्येले ते दिस.

आता आम्हाला पैका हवा.

लई तंगी हाय. नशीब फुटलं न् काय.

आई म्हनालीः "यांना आपली बिदागी परवडंल का?"

म्या हळूच म्हनालोः "आये, यांनी आपल्याला आडवांस दिलाय. त्योबी दुप्पट."

आई खुश झाली. ह्ये महारोगी आमच्या तालमींच्या येळी बी हजर व्हते. आईचं नाव घिऊ-घीऊन

तिला प्रोस्साहन द्येत व्हते. त्यांनी स्वताच्या बिड्या अन् ताडी बी आईला दिली.

येक जन मला म्हनालंः "नट व्हनं अवघड हाय ल्येका! आमच्या गावातलं भिकारी बी तुज्यापेक्षा जास्त कमावतंय."

असं म्हनून त्येनं मला चाहा दिला.

म्या नगं म्हनलं.

आय म्हनालीः "आरं, ग्लासात द्येतोय चा तर घ्ये की. घराकडं करवंटीतच पितुयास न्हवं."
आईकडं तीचं यगळं टमरेल हाय. पानी अन् ताडी आई त्यातनंच पिती.

आय मला म्हनतीः "काय खरं नाय या द्येशाचं. अजून कशाकशावर बंदी घाल्तीन द्येवाला म्हाईती."

चहा, पानी, हवा, मयती, भांडणं, दररोजची आन्घूळ, स्वच्छ संडास... सम्द्यावर बंदी.

आय म्हनतीः हितं संडास भी नाय.जमिनीत योक खड्डा क्येलाय निस्ता.पानी न्हाय. फकस्त प्येपरांचे तुकडे हायेत. मला नाय जमायचं ह्ये. आता पंतपरधानाच्या फोटूनं आपलं ढुंगण कसं पुसावं?"

हा. किंवा द्येवादिकाचे फोटू असल्या कामाला कशे वापरावे?

आई म्हनतीः "द्येव अन् धर्माचा आपल्या लोकांला लय नाद. तवा त्येचाच धंदा करावा".

आईची नाटकं कायम हाऊसफुल.

पर्त्येक जन सतत प्रार्थना करतो.

म्या ईचारलंः "का?"

आय म्हनालीः "बेरोजगारी इसरन्याचा तो येक मार्ग हाय.

माजी जुळी बहीन (हिनं आत्महत्या क्येली) म्हनतीः "द्येवधर्मापरीस वेश्याबाजीची नशा जास्त बरी नव्हं का?"

घणघणघण.... राममंदिरात घंटा वाजायला सुरवात व्हती....

आत कुटलीबी मूर्ती न्हाय तरी परत्येकाला त्यो दिसतो.

कुनी म्हनतं त्यो यवढासा हाय त कुनी म्हनतं हा येवडा भलामोटा हाय.

सगळीजनं मोठ्या चौकात जमून पूजा करत्यात.

माजी जुळी बहीन जी आत्महत्या करनार हाय ती म्हनतीः "पब्लिक आपलं नाटक उचलनार."

म्या इचारतोः “कशावरून?”

ती म्हनतीः “ या भागात लोकान्ला राम लय आवडतु.”

अन् कुंभकर्न?

माजी जुळी बहीन वराडतीः “चुलीत घाल तुजा कुम्भकर्न! त्ये मारून टाकतील तुला. तुज्या कपाळी लिहिल्यालं दिसंना का तुला?”

अन् ती रडायला सुरवात करती.

माज्या कपाळावर काय लिहिल्यालं हाय? त्ये बगायाला म्या मेकप-रूम मदी जातो.तिथं ना खिडक्या ना पानी ना आरशे.

आय म्हनतीः “या पुढं तू रामाचं काम क्येलंस तरच तुजी बहीन रडायची थांबल. मागला पूर्न म्ह्यनाभर लेकरू रातं न दिस निस्तं रडतंय. डोळं कोरडंठाक पडत्यान अशानं.”

माजी जुळी बहीन माज्याकडं पाहती.

मला आवडती ती.

पर कुंभकर्न मला लयंच आवडतो. अन् पेरियार सरांचं रामायन ऐकून तर राम मला आवडनासाच झालाय.

त्यामुळंच रामाच्या भूमिक्येला म्यां न्याय दीऊ शकनार न्हाय असं एक नट म्हनून मला वाटतं.
नाटक सुरू व्हतं.

माजा पह्यला प्रयोग.

म्या आईला नमस्कार करतू.

भायेर चार खेचरं एक मिनीबस वढत महारोग्यांला घीऊन येतात.

यका जुन्या हास्पिटलात आमचा प्रयोग हाय.बाळंतपनाच्या वार्डात.

आय म्हनतीः “आज आपल्या नाटकाला थेटर बी हाय. आप्रेशन थेटर.”

म्या विंगेतून पहातू.

द्येवाधीद्येव रामाची एन्ट्री व्हती.

शंख वाजतो.
अन् लाईट जाती.

मिट्ट अंधार.

गोंधळ.

येक महारोगी त्याचा तुटका हात ष्टेजवर फेकतो.

नाटक थांबतं.

लाईट जी जाती ती थेट आठवडाभर.

काय बी उद्योग न्हाय. सगळे हात चोळत बसल्याले.

या गावात येक हिकमती जोडपं हाय. आपल्या घराची येक खोली रातीच्या बोलीवर भाड्यानं देनं हा ह्यांचा जोडधंदा. दोघा लोकांसाठी येका रात्रीचे १०० रूपये. पन यांच्या सैपाकघरात जाऊन मानसाला आंघूळ बी करता येती.

म्या त्यांच्याकडं जातो.

मला झोप लागती.

मला झोपायला आवडतंच.

मला सपान पडतं.

पौर्निमा हाय.

अर्र, ह्ये काय? दोन अनोळखी चेहेरे? चंद्राकडं टक लाऊन पाहात बसलेले...

अचानक चंद्र तांबूस व्हतो.
अन् बघता बघता पेट घेतो !

चंद्राचे तुकडे पडायला सुरूवात व्हती.

ते तुकडे पृथ्वीवर पडायला लागत्यात.

दोन अनोळखी मानसं पळायला सुरूवात करत्यात.

म्या बी पळाया लागतो.

हातात झाडू घीऊन आय माज्या मागं धावती: "कुंभकर्णा कुंभकर्णा!!!"

म्या म्हनतो: " कुंभकर्न असनं चांगलंच हाय. सगळे सदासर्वदा झोपल्याले. मग आपलं जग नासवाया कुनीबी येणार न्हाई."

माजी जुळी बहीण म्हनती: "सावध रहा ! सावध रहा! टाय घातलेल्या दोन अनोळखी मानसांपासून सावध रहा !

पर मला कायबी कळत न्हाई.

पेटलेल्या चंद्राचा येक तुकडा माज्या बहिनीच्या अंगावर पडतो.ती जळून; परत, मरून जाती.

म्या रडतो.

दोन अनोळखी मानसं माज्याकडं रोखून बघत्यात.

म्या त्यांच्या टायकडं टक लाऊन बघतो.

**[विराम.]**

**अय्यरः** नमस्ते. आम्ही मिस्टर अय्यर आणि मिस्टर नायर. क्लास वन ऑफिसर्स.

**नायरः** ही आमची ओळखपत्रं. अटेस्टेड, गॅझेटेड, लॅमिनेटेड. आम्ही तुला अटक करणार आहोत.

**[विराम.]**

**अय्यर व नायरः** कोण आहेस तू?

**कुंभकर्णः** म्या...अं...त्ये...कुंभ...कुंभकर्ण.

**अय्यर व नायरः** कुंभकर्ण!!!!

**(दोघेही किंचाळतात.)**

**[विराम.]**

**(संगीत.)**

**कुंभकर्णः** अन् म्या माज्या सपनातून जागा झालो. लय इचित्र सपान व्हतं. ह्ये असलं कसलं सपान? ही असली कसली खोली? ह्यो वास कसला? सगळंच इचित्र. अन् ही दोन अनोळखी मानसं कोन हायेत?

**फेड आऊट.**

**प्रसंग ६.**

**एकच स्पॉटलाईट.**
**नायर इकडेतिकडे पहातोय. अय्यर एक स्टील ट्रान्समिटर बाहेर काढतो. त्यातून प्रकाशझोत आणि इलेक्ट्रॉनिक आवाज येतात.**

**अय्यरः** हेडक्वार्टर्स, धिस इज मि. अय्यर ॲंड मि. नायर रिपोर्टींग अ क्रायसिस! आय रिपीट, अ क्रायसिस! ओके. ओवर ॲंड आऊट.(**नायरला**) वॉव! या मोहिमेवर मॅडम एक्सची नेमणूक केली गेली आहे. त्या लवकरात लवकर चार्ज घेतील !

**(स्टेजवर अचानक धूर. त्यानंतर मॅडम एक्सचा आवाज.)**

**अय्यरः** टक टक..टक टक..

**मॅडम एक्सः** कोण आहे?

**नायरः** तुम्ही ज्याला प्रश्न विचारणं अपेक्षित आहे तोच तुम्हाला प्रश्न विचारत असेल तर तो सरकारी अधिकारी असणार हे निश्चित.

**अय्यरः** शू...गप्प बस.आपल्याला तिची मदत हवी आहे.

**[विराम.]**

**मॅडम एक्सः** कोण आहात तुम्ही? आणि काय प्रॉब्लेम आहे?

**अय्यरः** मॅडम, एक वाईट, फार फार वाईट बातमी आहे.

**नायरः** म्हंजे ब्रम्हापासून उत्पत्ती,विष्णू कडून जोपासना आणि रुद्राकडून विनाश हे तर तुम्हाला माहित आहेच.

**मॅडम एक्सः** मि. अय्यर आणि मि. नायर ! या बडबडीचा अर्थ काय?

**अय्यरः** अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीनं एक भयानक समस्या निर्माण झालेली आहे. या गावात फार विचित्र गोष्टी घडू लागलेल्या आहेत.

**मॅडम एक्सः** हं..गांभीर्य जाणवतंय पण मुद्दा स्पष्ट करा.

**[विराम.]**

**नायरः** **(दबक्या आवाजात)** अय्यर...कशाला फोन केलास या बाईला?

**अय्यरः** **(दबक्या आवाजात)** नायर, कालचा सावळा गोंधळ आठवतोय ना?

**(फ्लॅशबॅक)**

**नायरः** आता या कुंभकर्णाचं काय करायचं?

**अय्यरः** हा राक्षस आहे वर असुर आहे.

**नायरः** तो आपल्या लोकांविरुद्ध आणि कायद्यांविरुद्ध बोलतोय.

**अय्यरः** आपला देश जर असुरभूमी झाला तर काय होईल कल्पना आहे ना?

**नायरः** काही काळ काहीच होणार नाही. नंतर मात्र सगळीकडे अराजक आणि गोंधळ माजेल.

**(ते दोघेही स्वतःच्या विनोदावर खुश होऊन हसतात.)**

**अय्यरः** हद्द झाली ! या देशातल्या लोकांसाठी करावं तरी किती अजून? हीच बकबक यानं चीनमध्ये केली असती तर? पुरुषभर खड्ड्यात गाडला असता किंवा छाटला असता याला. पण इथं हा कॉम्रेड कुंभकर्ण वाटेल ते बोलू शकतो. आपण दोघं आर्यांच्या कटाचा एक भाग आहोत असं म्हणतो हा? व्हॉट नॉनसेन्स! जसं काही असुरांचा काही विकास झालाच नाही. अरे, आकडे पहा ना तुम्ही.

**नायरः** **(निश्वास सोडतो)** याला संपवला पाहिजे. निर्वंशच केला पाहिजे याचा.

**अय्यरः** हं..पण कसा?

**नायरः** हे पहा,आपत्कालीन व्यवस्थापनात असणाऱ्या प्रत्येक माणसाला हे माहीत असतं की संस्थेला असलेली त्याची किंमत ही समस्येच्या स्वरूपावर निश्चित होते. समस्या जितकी मोठी तेवढं महत्त्व जास्त.

**अय्यरः** ते नवशिक्यांचं सांगू नकोस मला.

**नायरः** मित्रा नीट ऐक. हे आधुनिक नाही हे तर फारच जुनं तत्त्वं आहे. आणि जुनं ते सोनं. मल्हारराव होळकर माहित आहेत? त्यांनी पानिपताच्या युद्धावेळेस दत्ताजी शिंदेंना काय सल्ला दिला माहित आहे का? ‘सर्व शत्रूंना नष्ट करू नका नाहीतर पेशव्यांना आपली किंमत रहाणार नाही.’ कळतंय का काही?

**अय्यरः** हं..पण मग आपण कुठला मुद्दा पुढे रेटायचा?

**नायरः** आपल्याला, कोणीतरी शत्रू निर्माण झाला असल्याचा देखावा करायचा आहे.या कुंभकर्णाला तर आपण संपवूच. आपली राष्ट्रभाषा हिंदी असणं हा एक कट आहे असं म्हणतो हा ! आणि याच मुळे आपण मॅडम एक्सशी संपर्क केला.आठवतंय का आता तरी?

**(यावर जणू वाट पहात असल्यागत मॅडम एक्सचा आवाज येतो.)**

**मॅडम एक्सः** ही ‘अंतर्गत सुरक्षा समस्या’ तितकी महत्त्वाची आहे?

**अय्यरः** होय होय. निश्चितच. माझ्यावर विश्वास ठेवा मॅडम.

**नायरः** थांबा, माझ्यावर विश्वास ठेवा. आम्ही त्या कॉम्रेड कुंभकर्णाला अटक केलेली आहे.

**मॅडम एक्सः** कोणत्या आरोपांखाली?

**अय्यरः** अं...अं...माननीय पंतप्रधानांच्या जनसंवाद योजनेअंतर्गत आम्ही मागच्या आठवड्यात टीव्ही सेट्स वाटत होतो, तर हा म्हणाला असं नका करू. आम्ही विचारलं का बाबा तर म्हणाला...

**नायरः** लोकांना टीव्ही ची गरज नाही.कारण....

**अय्यरः** टीव्हीमुळे सामूहिक गुंगी येते. माणसं बधीर होतात. असं म्हणाला तो!

**मॅडम एक्सः** पण त्याला अटक करण्याकरता एवढं कारण पुरेसं आहे?

**अय्यरः** अं...अं... त्याच्या जन्माच्या वेळेस हजर असलेल्या सुईणीची पण आम्ही चौकशी केली. ती म्हणते की हा कुंभकर्ण जन्मल्या जन्मल्या टयहां टयहां करून न रडता ओरडला ! काय माहितायः लाल सलाम! (**करून दाखवतो**). आणखी सांगतो. गावातलं ताडीचं दुकान आम्ही पाहिलं. यू वोन्ट बिलिव्ह मॅडम त्या दुकानाच्या मुख्य भिंतीवर कम्युनिस्ट चिन्ह रंगवलेलं आहे.

**नायरः** आणि आम्हाला वाटतंय हे कॉम्रेड कुंभकर्णाचंच काम आहे.

**मॅडम एक्सः** हा पुरावा देखील तितका सबळ नाही.

**अय्यरः** त्याच्या जुळ्या बहिणीनं आत्महत्या केली.

**नायरः** आणि रीतसर अंत्यविधी करून तिच्या आत्म्याला शांती देण्याऐवजी त्यांनी काय केलं? तिच्या पार्थिवासमोर, दास कॅपिटलचे उतारे वाचले!

**अय्यरः** ॲंड फायनली, तो म्हणतो हिंदीवर बंदी आणली पाहिजे आणि तिच्या जागी दुसरी भाषा आणली पाहिजे.!

**मॅडम एक्सः** कमाल आहे. हिंदी ही तर सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे.

**नायरः** बरोबर. पण कॉम्रेड कुंभकर्ण म्हणतो की या न्यायानं देशाचा राष्ट्रीय पक्षी मोर नको तर कावळा हवा.

**अय्यरः** हिंदी भाषा हे असुरांच्या शोषणासाठी वापरण्यात येणारं ब्राह्मणी हत्यार आहे, असं कॉम्रेड कुंभकर्ण म्हणतो.

**नायरः** हिंदी भाषा हे संपूर्ण देशावर हुकुमत गाजवण्याचं दिल्लीचं कारस्थान आहे; असंही कॉम्रेड कुंभकर्ण म्हणतो.

**मॅडम एक्सः** हं....मग आता तुमचा सल्ला काय आहे?

**अय्यरः** मॅडम, आता एकच मार्ग उरलाय. कॉम्रेड कुंभकर्णाला अटक करणं.

**नायरः** कॉम्रेड कुंभकर्णानं इतरांच्या मनात विष कालवण्याअगोदर आपण त्याला जेरबंद केला पाहिजे असं मला वाटतं.

**नायरः** वा. साधो. या प्रसंगी आणखी एक श्लोक उद्धृत केल्यावाचून रहावत नाही.
इदं सर्वम खलु आह्म एवा | सनातनम अन्याद नास्ति |
अर्थात, मी म्हणजेच सर्वकाही. माझ्याशिवाय या जगात चिरंतन असे काहीही नाही.

**अय्यरः** तत्त्वनिष्ठेचा अंत म्हणजे दुराग्रह आणि दुराग्रहाचा अंत म्हणजे दुर्बोधता.

**नायरः** असो. तर रूपकात्मकतेकडून आपण वस्तुनिष्ठतेकडे वळूया. बरोबर ना मॅडम?

**मॅडम एक्सः** **(कलकलाट करत)** माझ्याकडून पूर्ण परवानगी! अय्यर आणि नायर. वेलडन. तुमची डबल प्रमोशनसाठी शिफारस ! आता शुंभासारखे नुसते उभे राहू नका. जरा नाच, गाणी होऊ द्या. जल्लोष करा!

**(संगीत.**
**अय्यर आणि नायर एकमेकांचे चुंबन घेतात. गाऊ लागतात.)**

*ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग*
*वॉट इज मोबाईल नंबर?*
*वॉट इज युअर सेल नंबर?*
*मॅडम का फोन आया*
*कर दिया कॉम्रेड अंदर*
*टेलीफोन टेलीफोन पोलिटिक्स*
*ना कशाचा कशाला मेळ*
*वेडा ठरवण्या शहाण्याला लागतोय कितीसा वेळ*
*ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग.....*

**प्रसंग ७**

**कोरस येतो.**
**एक पणती लावली जाते. प्रतिकात्मक!**
**नारळ फोडला जातो.**
**घंटा वाजतात. ट्रिंग ट्रिंग**
**स्टेजवर असलेल्या एका लहानशा मूर्तीला दंडवत घातला जातो.**
**थोडे संगीत, नृत्य आणि बागडणे सुरू होते.**

**शाहीर+कोरसः**

आमच्या सरकारचा बोल कवतिके।
लोकशाहीशी पैजा जिंके। विद्रोही सूर
दाबुनी टाके जी जी जी जी जी जी ।
इरोडाहून तंजावूर
कॉम्रेडला न्येला दूरदूर
हळूहळू हरवला सूर
बंदोबस्त क्येला भरपूर
लढाईचा जमला सारा नूर
लढाईचा जमला सारा नूर
सोबतीला दोस्त ना यार
कुंभकर्नाची मारामार
अन्नादुराई अन् पेरियार साथीला जीरहां जीरहां जी
साथीला जीरहां जीरहां जी ।

**शाहीरः** रविवारी दुपारी
ज्येलचं दार करकरा वाजलं
ज्येलर भायेर आला
अन् घात की हो झाला
ज्येलरनं कॉम्रेडला धरला
आन् गजाआड क्येला
कॉम्रेड झाला बंदी हो जीरहां जीरहां जीरहां जी ॥
शुकसाधूंचा मेळा भायेर
जाचतलाशी अपरंपार
खानेसुमारीची त्यात भर हा हा हा हा हा
चिवडला सारा इतिहास
अवहेलना आनि उपवास
आता पुरता आवळला फास
कॉम्रेडचा गिळाया घास

**शाहीरः** मंडळी, जान प्यारी अन् प्रसंग तर बाका

अंधारातून येत्यात हाका
उडाली हाय येकच घाई
आनि जेलमधी कॉम्रेडला
मुतायचीबी परवानगी न्हाई

**शाहीर+कोरसः** आमच्या सरकारचा बोल कवतिके....॥धृ॥

**प्रसंग ८**

**प्रकाश.**
**रंगमंच आता एखाद्या इंटरोगेशन रूमप्रमाणे.**
**अय्यर आणि नायर बसलेले.**
**विडिओ रेकॉर्डींग करता कॅमेरा व लाईट्स सुरू केले जातात.**
**कुंभकर्ण येतो. त्याला साखळदंडांनी जखडलेला वगैरे.**

**अय्यरः** तर कॉम्रेड कुंभकर्ण. आलास? गुड. बस. तुझ्या माहितीकरता सांगतो, ही सुनावणी एका पीडब्ल्यूडी गेस्ट हाऊसमध्ये होते आहे.

**नायरः** तुझं स्वागत. तुला राहायला काही त्रास तर नाही ना झाला? अन्न, पाणी, औषधं वगैरे सर्व तुला उत्तम प्रतीचं मिळालं असावं ही आशा आहे.

**अय्यरः** काही तक्रार?

**(कुंभकर्णाकडून काहीच प्रतिसाद नाही.)**

**नायरः** गुड. हा तुझा एफआयआर. हे एनओसी डॉक्युमेंट. यावर तू सही करावीस अशी आम्ही तुला विनंती करतो.

**(कुंभकर्णाकडून काहीच प्रतिसाद नाही.)**

**अय्यरः** (औपचारिक आदरानं हसतो.) कॉम्रेड कुंभकर्णजी, हा कॅमेरा तुमचा इंटरव्ह्यू रेकॉर्ड करणार आहे, वुड यू लाईक टू से हॅलो टू इट?

**(कुंभकर्ण जोरजोराने नकारार्थी मान हलवतो.)**

**नायरः** असो. तर तुला आम्ही रविवारी मच्छीबाजारात अटक केली. अटक करतेवेळी तुझ्याकडं विध्वंसक, राष्ट्रद्रोही कागदपत्रं आढळली. बॉम्ब कसा तयार करावा ह्याची माहिती देणारी ही कागदपत्रं आहेत.

**कुंभकर्णः** अं..अं.. पर...ती माजी बाजारहाटाची यादी हाय.

**अय्यरः** नो, नो, नॉट ॲट ऑल, नेवर..कॉम्रेड कुंभकर्ण, कृपया सरकारी कामामध्ये व्यत्यय आणणं थांबव.

**(कुंभकर्णाला जबरदस्तीनं एक गोळी दिली जाते.)**

**नायरः** कॉम्रेड कुंभकर्ण. तुला पुन्हा एकदा आठवण करून देतो- भारतीय दंडविधानााच्या १२०(ब), १२१(अ), १२४(अ), १५३ अ आणि ब, या कलमान्वये, आणि यूएपीए २००४ च्या ३८, ३९, ४० या कलमान्वये तुझ्याविरुद्ध १८ गुन्हे दाखल झालेले आहेत. महत्त्वाची सूचनाः राजद्रोह, सशस्त्र उठाव, कट आणि प्रतिबंधित असुर गटाला समर्थन या गुन्ह्यांना तीन वर्षांपर्यंत जामीन मिळू शकत नाही.

**(कुंभकर्णावर गोळीचा अंमल चढू लागतो.)**

**अय्यरः** शू...! तो पहा तो झोपला. इन फॅक्ट, तो घोरतोय.

**नायरः** निश्चित आणि अगदी व्यवस्थित. हे असह्य आहे; नाही नाही, हा पूर्ण अनर्थ आहे.

**अय्यरः** कॉम्रेड कुंभकर्ण काहीतरी बरळतोय...का गरळतोय?

**नायरः** काहीतरी कोंगाडी बरळतोय. भविष्याची वाईट स्वप्नं पडत असतील बहुतेक. शू... ऐका....

**(शांतता.)**

**(एक स्थलांतर.)**

**कुंभकर्णः** **(नशेत बरळल्यासारखा बोलू लागतो. हळू हळू त्याचा आवाज वाढू लागतो.)** प्रणाम. विश्वतत्त्वाला माझा प्रणाम. मी विश्रवाचा पुत्र, वज्रवालेचा पती, पर्वतप्राय, महाकाय. साळींदराच्या पिसांप्रमाणे माझा केशसंभार आहे. चक्रीवादळाप्रमाणे माझा श्वास आहे. आषाढघनाप्रमाणे जरी मी श्यामलवर्णी असलो तरी, सुसंस्कृत आणि महापराक्रमी आहे. माझं राजवर्खी चिलखत पहा. पहा कसं तेजानं झळाळतंय! माझ्या डोळ्यात पहा..पहा.. काय दिसतंय...हिमालय..! माझे स्वेदबिंदू कोणता गंध आणतात? हा गंध आहे हजारो नीच माणसांच्या कंठस्नानानाचा. हा हा हा...ओळखलंत मला? जर अजूनही तुम्ही मला ओळखला नसाल तर मी तुम्हाला माझ्या काळझोपेचा शाप देतो.

**अय्यरः** शू...तर सुरुवात. कॉम्रेड कुंभकर्ण, तू तुझ्या कबुलीजबाबात झोपेबद्दल बोललास. झोप; दॅट इज स्लीप. आम्हाला कळलाय हा संदर्भ. तू स्लीपींग सेलबद्दल बोलत होतास. स्लीपींग सेल म्हणजे काय ते माहित आहे ना? या शब्दाला आता पूर्वीचा अर्थ उरला आहे का? बोल.

**(कुंभकर्णाची सर्व उत्तरं टायपिस्ट टाईप करतो.)**

**कुंभकर्णः** सगळी स्वप्नं...स्वप्न..स्वप्नावस्था...भयानक स्वप्नं...अन् मला तर दिवास्वप्नं बी हवीहवीशी वाटतात.

**नायरः** अन् स्वातंत्र्य?

**कुंभकर्णः** त्ये बी हवंहवसं वाटतं. यका दिवसाची झोप, सहा मह्यन्यांचं स्वातंत्र्य. मज्जाच मज्जा.

**अय्यरः** हं..स्वातंत्र्य तुला किती खरं वाटतं कॉम्रेड कुंभकर्ण?

**कुंभकर्णः** आत्मा आनि मन याचा समानार्थी शब्द म्हंजी स्वातंत्र्य.

**नायरः** कधी राजधानीत गेला आहेस?

**कुंभकर्णः** हा....राष्ट्रीय धर्मनिरपेक्ष लोककला समितीनं आईला बोलावलं व्हतं कला सादर करायला. राष्ट्रपती भवनामधी. म्या बी तिच्या संगं ग्येलो व्हतो. तिचा प्रयोग सुरू असताना मला जोराची लागली. म्या मोरीमदी ग्येलो. अन् दार उघडतो तो काय, आतमदी चक्क भारताचा राष्ट्रपती! म्या तर घाबरून पळतच सुटलो. नंतर मला लोकांनी सांगितलं का राष्ट्रपतीच्या मोरीला कडी नसती.

**अय्यरः** परत कधी राष्ट्रपतींना भेटलास का?

**कुंभकर्णः** न्हाई.

**नायरः** भेटावसं वाटतं का?

**कुंभकर्णः** न्हाई.

**अय्यरः** मग काय करावसं वाटतं?

**कुंभकर्णः** मला प्रवास करावा वाटतो. लय फिरावसं वाटतं.

**अय्यरः** कुठं?

**कुंभकर्णः** पुस्तकात. यखाद्या महाकाव्यातून फिरावसं वाटतं.

**नायरः** रामायण?

**कुंभकर्णः** पेरियार सरांचं रामायण? हां बहुतेक.

**अय्यरः** वेल, आम्ही तुला त्याची एक प्रत देऊ शकतो.

**कुंभकर्णः** न्हाई सर...त्ये तुमाला परवानगी द्येनार न्हाईत.

**नायरः** का?

**कुंभकर्णः** तुमच्या द्येशाच्या कायद्यात आता मतभेद सहन क्येला जात न्हाई सर.

**अय्यरः** एक मिनिट. काय म्हणालास तू? “तुमचा देश”? हा देश तुझा नाही का?

**[विराम.]**

**अय्यरः** हा प्रश्न मी पुन्हा एकदा विचारू?

**(कुंभकर्णाकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही.)**

**नायरः** तू तुरुंगात आनंदात आहेस?

**कुंभकर्णः** **(हसतो)** आनंद ! सहा म्हईने समाधी अन् सहा म्हईने निश्चिंततेमुळं माजं आयुष्य बेडकागत झालंया. म्या तर आता दिसाया बी बेडकागत लागलोया.

**अय्यरः** बदल का करून पहात नाहीस? तुझ्या चेहेऱ्यात बदल कर, तुझ्या नशिबात बदल कर. कॉम्रेड विभीषणाप्रमाणे वाग. तुझ्या इतर साथीदार असुरांची नावं आम्हाला सांग. ते असुर आपले राष्ट्रीय शत्रू आहेत.

**कुंभकर्णः** न्हाई सर...

**नायरः** का?..

**कुंभकर्णः** माज्या सारखा एकटा-एकाकी राक्षस या बलदंड आर्यसत्तेविरुद्ध काय करू शकतो?

**नायरः** तू नट आहेस हे आम्हाला माहित आहे. पण मग जगण्यासाठी काय करतोस?

**कुंभकर्णः** जगण्यासाटी म्या झोपतो. काय खुळा प्रश्न हाय.

**अय्यरः** तुझी पत्नी आणि मुलं?

**कुंभकर्णः** माझी बायको व्रिजाला समुद्रावर शेलके शिंपले शोधून त्ये विकती.

**नायरः** हे असं कसं घडलं?

**कुंभकर्णः** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा तिचा जन्म हाय.

**अय्यरः** हे तुला मान्य आहे?

**कुंभकर्णः** काय? तिचं जन्माला येनं? हां...परत्येकच जन जनमतो सर....

**अय्यरः** नाही नाही, माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की तिच्या व्यवसायाचं हे स्त्रीवादी स्वरूप तुला पटतं का?

**कुंभकर्णः** हा. अन् तसबी भुकेल्या अन् झोपाळू माणसाकडं फार पर्यायबी नसत्यात.

**अय्यरः** अन् तुझी मुलं काय करतात?

**कुंभकर्णः** जगत्यात. हा काय प्रश्न हाये?

**नायरः** तू आमची थट्टा करतो आहेस? ही सगळी काय मजा चालली आहे?

**कुंभकर्णः** न्हाई सर. पन दहातोंडी रावनाचा म्या एकतोंडी भाऊ ही बी मज्जाच न्हाई का?

**अय्यरः** दहा तोंडं! अशक्य वाटतं ना?

**नायरः** की शारीरिक विकृती?

**कुंभकर्णः** वाल्मिकीला काय अशक्य हाय? २३,७३४ श्लोक रचले त्यानं.

**अय्यरः** बास इतकंच? तुझ्या लोकांचं काय? ते कुरूप, भेसूर राक्षस! त्यांच्या त्या लवलवत्या जिभा, भयानक शरीरं, क्रूर विचार.....

**कुंभकर्णः** न्हाई सर. लय वाढवून चढवून सांगितल्यालं हाय. अतिशयोक्तीतून क्येलेली काव्यनिर्मितीच म्हनाना.

**नायरः** अतिशयोक्ती? वाल्मिकीकडून?

**कुंभकर्णः** व्हय बी अन् न्हाई बी कदाचित.

**अय्यरः** वेल, तू काय बोलतो आहेस हे मला समजत नाहीये.

**कुंभकर्णः** तुमाला कंबन माहीत हाय का?

**नायरः** कोण?

**कुंभकर्णः** हा येक तामिळ कवी व्हता. फार फार वर्षांपूर्वी होऊन ग्येला. उत्तरेत केलेल्या कामाची इकडं जी भाषांतरं अन् रूपांतरं झाली ती ह्याला आवडायची न्हाईत. त्या काळातल्या इतरबी कवींना ती आवडायची न्हाईत. पर या कंबननं मग ९ व्या शतकात रामायनच रचलं. ह्ये आज बी माहिती हाय अन् तामिळ लोकांला लय आवडतंबी.

**अय्यरः** वेल..

**कुंभकर्णः** अन् या कंबनच्या रामायनात माजा भाऊ रावन हिरो हाय. अन् त्यो त्या दुबळ्या अन् शेळपट रामापेक्षा लय उठून दिस्तू. आता बोला सर..

**नायरः** ओहो......

**कुंभकर्णः** म्हंजी?

**अय्यरः** येतंय.. आता सगळं लक्षात येतंय.. इथेच या दुफळीला सुरुवात झाली असणार.. पश्चिम वि. पूर्व, आर्य वि. द्रविड, वैष्णव वि. शैव, आक्रमक वि.भूमिपुत्र, भारतीय वि. नक्षल, वॉव वि. माओ..

**कुंभकर्णः** सर, आता तुम्ही मजा करताय...

**नायरः** नाही.

**कुंभकर्णः** हा प्रदेश बघा सर...केवढा प्रचंड अन् किती सुंदर...सुवर्णभूमीच जनू. रावनाचा द्येशबी अगदी असाच. इतरांपेक्षा आमचं अन्न वेगळं असल सर पन आमचं राज्य, राज्यकारभार अन् राजा ह्ये त्या काळातसगळ्यात उत्तम व्हतं अन् राहीलबी.

**अय्यरः** त्यानं काय होतं? अरे राक्षसांनो, तुमच्याकडे ना स्वतःचं राष्ट्रगीत ना फुटबॉल टीम. तुम्ही कधी मिस युनिवर्समध्ये भाग घेतलाय का?

**कुंभकर्णः** सर, इथं इतिहासानं आमच्यावर अन्याय क्येलेला हाय. धर्मानं मला फरकच पडत न्हाई; पर इतिहासानं फक्त वंश वाढावा म्हनून माझ्या लोकांचं चारित्र्यहनन क्येलेलं हाय.

**नायरः** मग तुझी काय अपेक्षा आहे? पराभूतांचा कुठं इतिहास असतो का? तुझ्या जगाप्रमाणेच आमच्या जगालाही फक्त जेत्यांचं गाण ऐकायचं असतं.

**कुंभकर्णः** अन् तुमच्या मताप्रमानं ज्येत्यांचं गानं कंचं हाय?

**अंधार.**

**प्रसंग ९**

**जेत्याचं गाणं.**

**कोरसः** आली आली हो भागाबाई
आली आली हो भागाबाई
आली आली हो भागाबाई
आली आली हो भागाबाई
सरकारची दडपशाही ह्या द्येशाचं काई खरं न्हाई.
आली आली हो भागाबाई
आली आली हो भागाबाई.

**एकजणः** कुंभकर्ण सोडून त्यानं आयुष्यात कुठलंच
काम क्येलं न्हाई.
बायको म्हनाली ह्ये बरं न्हाई
असाच वागलास तर आपलं काही खरं न्हाई
पर तिचं सुदिक त्येनं ऐकलं.....

**कोरसः** न्हाई.....!

**एकजणः** पर बातमी मिळायचा अवकाश
**(पुन्हा गाणे सुरू.)**
सगळ्यांना झाली घाई
जो-तो कॉम्रेडला ओढू पाही
नाटकात फिरली त्याची द्वाही
विकिपिडीयावर आला  सीव्ही
आता टीव्ही बी त्याला दूर न्हाई
आली आली हो भागाबाई.

**(टीव्हीवर कुंभकर्ण)**

**कुंभकर्णः** **(खोट्या आवाजात)** निद्रानाश? रात्र रात्र झोप लागत नाही? तुम्ही अतिताण आणि थकव्याचे बळी आहात. माझ्यासारखं व्हायचंय? माझ्याइतकं शांत झोपायचं? मग घ्या या गोळ्या.

**[विराम.]**

कुंभकर्णाप्रमाणे, म्हणजे जणू काही कुंभकर्णाप्रमाणे  झोपा !

**[विराम.]**

घ्या फक्त आणि फक्त
कुंभकर्ण पिल्स !
कुंभकर्ण पिल्स ! जस्ट पॉप देम!

**[विराम.]**

**शाहीर+कोरस**
**(चालः माझी मैना गावावर राहिली.):**

कुंभकर्णाची दैना कुंभकर्णाची दैना
कुंभकर्णाची दैना होऊ राहिली
आमच्या जीवाची होतीया काहिली
कॉम्रेडची दैना होऊ राहिली
आमच्या जीवाची होतीया काहिली
बोलला तो जवा असुरांबद्दल|
घडवली त्याला चांगलीच अद्दल | जाब ईचारला खोदून खोदून|
काढला त्याला फरकाटून, फोडून, उचकटून ,सोलून
कॉम्रेड रक्ताळला  हा हा हा हा हा हा हे
कॉम्रेड रक्ताळला | त्यो किंचाळला | अन् पिसाटला |
न्यायाची चव त्यानं पाहिली | आमच्या जीवाची होतीया काहिली|
पर काळजीचं कारन न्हाई | आपल्यात कुनीबी कॉम्रेड न्हाई
पर कॅपिटा, जीडीपी, क्रेडिट कार्डाच्या आपल्या जगातच कुंभकर्ण न्हाई |

झाली सुरू पारध हा हा हा हा हा हे
झाली सुरू पारध | आले दिवस भरत | कॉम्रेड होईल गारद| आता आस काहीबी न्हाई राहिली | आमच्या जीवाची होतीया काहिली |

**प्रसंग १०**

**पुन्हा खोलीत.**

**कुंभकर्ण अतीव थकलेला.**

**[विराम.]**

**अय्यरः** तर कुंभकर्णाबद्दलचे आपले प्रश्न पुढे चालू ठेऊ. मी आता कॉम्रेड कुंभकर्णाला असं विचारतो- तू कधी रामाला भेटला होतास ?

**कुंभकर्णः** दोन-तीनदा.

**नायरः** माणूस म्हणून तो तुला कसा वाटला?

**[विराम.]**

**कुंभकर्णः** ठीक वाटला. बान सोडण्यात लय पटाईत.बाकीच्या गोष्टी माला म्हाईत न्हाईत. त्या तुमी माज्या भावांना ईचारा.

**अय्यरः** तू रामाला देव मानतोस?

**कुंभकर्णः** माला काहीच बोलायचं न्हाई.

**नायरः** एक राक्षस आणि ब्रह्माचा शिष्य आहेस तू. तू देव मानतोस?

**कुंभकर्णः** माला काहीच बोलायचं न्हाई.

**अय्यरः** अस्सं...पोलिसांनी तुझ्या घरावर जेव्हा धाड घातली तेव्हा झडतीत त्यांना ही चिठ्ठी मिळाली. यात तू काय म्हणतोस ऐक. तू म्हणतोस, 'दिल्ली आणि दिल्लीतलं सरकार शब्दांचे खेळ करण्यात तरबेज आहेत. ते काहीही बोलतात आणि त्या बोलण्याला स्वतःला हवा तोच अर्थ देतात. आता तर निवडणुका जवळ आल्यात. तेव्हा हिंदू आणि आर्यांना मुस्लीम आणि द्रविडांचा जाच होणारच. इथे मी तुम्हाला द्रविड व मुस्लिमांसाठी संयुक्त स्वतंत्र राज्य निर्माण करण्याबद्दल झालेल्या आपल्या बोलण्याची आठवण करून देऊ इच्छितो.' काय म्हणायचं काय तुला या पत्रात? हा फुटीरतावाद आहे, देशद्रोह आहे हा.

**कुंभकर्णः** न्हाई न्हाई सर त्ये माजं पत्र न्हाई. त्ये पेरियार सरांनी महम्मद अली जिनांना लिहिलेलं पत्र हाये. १९४४ मधी.

**नायरः** अच्छा? पण मग त्याची कॉपी तुझ्याकडे कशी?

**कुंभकर्णः** माज्या बाबानं दिली हाय ती मला.

**अय्यरः** आणि तुझ्या वडिलांकडे ती कुठून आली?

**कुंभकर्णः** माज्या आज्यानं ती माज्या बाबाला दिली.सर, ७ जानेवारीला पेरियार सरांनी मुंबईला धारावीत एक सभा घेतली व्हती. त्या सभेत त्ये पयल्यांदा स्वतंत्र द्रविडनाडूबद्दल बोलले.

**नायरः** हे तुला कसं माहित?

**कुंभकर्णः** माजा आजा व्हता त्या सभ्येला. त्यो धारावीत चिक्कीमजूर व्हता. चिक्की अन् कशिदा करण्याचं काम आमच्यातले काही लोकं करायचे धारावीत. तुमाला म्हाईत हाय का सर, पेरियार, जिना अन् आंबेडकर मुंबईत भेटले व्हते. त्यांनी स्वतंत्र द्रविड द्येशाची

योजना आखली व्हती. यात तामिळनाडू, आन्ध्र, दख्खन अन् पूर्व किनाऱ्यावरची सगळी राज्यं तर असनार व्हतीच, आनखी दलित अन् मुस्लीम राज्य बी असनार व्हती. असं जर का खरंच झालं असतं तर भारतात काय ऱ्हायलं असतं? फक्त काही हिंदी राज्यं बास.. अन् अर्थातच गुजरात.

**अय्यरः** अच्छा...मला सांग स्वतंत्र राष्ट्र कल्पनेवर तुझा अजूनही विश्वास आहे?

**कुंभकर्णः** पेरियार, जिना अन् आंबेडकर तर आता न्हाईत. अन्नादुराईंनीबी ६२ साली आशा सोडून दिली.

**नायरः** तुझं काय?

**(शांतता.)**

**अय्यरः** शुड द क्वेश्चन बी रिपीटेड?

**अय्यरः** हं.....आता धरून चाल की तू आणि तुझी लोकं हे असुर नाहीत. तर मला सांग तुला काय वाटतं, तुम्ही देव होऊ शकाल?

**कुंभकर्णः** व्हय बी अन् न्हाई बी. त्ये बऱ्याच गोष्टींवर अवलंबून हाय.

**नायरः** अन् जर तुम्ही देवांना हुसकावून लावलात तर तुम्ही असुर आजचे राजे व्हाल?

**कुंभकर्णः** मला बोलायचं न्हाई.

**अय्यरः** अच्छा... मला सांग, पौर्णिमेच्या रात्री जेव्हा सुरुंगाचा स्फोट होऊन २४ लोक मेले तेव्हा तू कुठे होतास?

**(कुंभकर्ण काहीच बोलत नाही.)**

**नायरः** २७ लोक मेले.

**(कुंभकर्ण काहीच बोलत नाही.)**

**अय्यरः** आम्ही सावकाशपणे बोलू का कॉम्रेड? दुसऱ्या कोणत्या भाषेत बोलू? तामिळमधे बोलू?

**[विराम.]**

**कुंभकर्णः** म्या यकदा मरनाशी झुंज दिलेली हाय सर.

**नायरः** हं....आणि वेदना?

**कुंभकर्णः** वेदना सोसल्याबिगर सुख कसं मिळायचं?

**अय्यरः** संधी मिळाली तर तुला तुझं आयुष्य वेगळ्या पद्धतीने जगायला आवडेल?

**कुंभकर्णः** न्हाई सर.

**नायरः** का?

**कुंभकर्णः** **(अडखळतो)** माज्या बाबाला माज्या आजानं अन्नादुराईंचं एक सूत्र सांगितलं व्हतं. अन्नादुराई म्हनायचे की दर साडेचार लाख वर्षांनी जग संपूर्ण उलटं व्हतं. म्हंजी दक्षिन ध्रुव उत्तर ध्रुव व्हतो, अन् उत्तर दक्षिन.

**अय्यरः** बरं मग?

**कुंभकर्णः** तर ही साडेचार लाख वर्षं पुढच्या शे दोनशे वर्षांत संपनार हायेत. अन् तवा आमच्या असुरांचा काळ सुरू व्हनार हाय.

**नायरः** म्हणजे?

**कुंभकर्णः** पुढच्या महासंग्रामात आमचा जय व्हनार ह्ये निश्चित हाय.

**अय्यरः** कलियुगाचा अंत...नव्या युगाची सुरूवात? म्हणजे यादवी युद्ध?

**कुंभकर्णः** तसं म्हना हवं तर.

**[विराम.]**

**नायरः** हं....तुला वाचण्याकरता पुस्तकं हवी आहेत असं आम्हाला सांगितलं गेलं. त्याप्रमाणे आम्ही तुला होमरच्या ग्रंथाचा तमिळ अनुवाद पाठवलाही होता, पण तू त्याची सर्व पानं फाडून टाकलीस? का?

**कुंभकर्णः** व्हय. मला कंटाळा आला.वाचता वाचता म्या चक्क झोपलो. म्हंजी मला झोपायला तसं कारन लागत न्हाई म्हना. **(जरा विचार करून)** होमर आंधळा व्हता...अन् त्यापेक्षाही म्हत्त्वाचं म्हंजी...

**अय्यरः** काय?

**कुंभकर्णः** सर, तुम्हाला ह्ये लक्षात आलंय का की होमरच्या ग्रंथातल्या कोनाचीच देवळं न्हाई बांधली ग्येली, पर तुमच्या रामायनातल्या पर्त्येकाचं देऊळ बी हाय अन् लाखो भक्त बी. फकस्त येक सोडून.

**नायरः** कोण?

**कुंभकर्णः** मी..!

**अय्यरः** अरे, कॉम्रेड कुंभकर्णा तुझं देऊळ असूच शकत नाही.

**कुंभकर्णः** का सर?

**नायरः** पहिली गोष्ट म्हणजे हे रामायण आहे. ग्रंथातल्या नायकांच्या आदर्श वागण्याद्वारे समाजावर प्रभाव पाडून समाजाची, लोकांची नैतिक उन्नती घडवणं हा रामायणाचा

मुख्य उद्देश आहे. आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पती, आदर्श सेनापती, आदर्श राजा, आणि जो तुला स्वतःला माहित आहे तो, आदर्श योद्धा या सर्वांचं मूर्तिमंत स्वरूप म्हणजे श्री राम नव्हे का?

**कुंभकर्णः** रामाच्या चांगल्या-वाईटपणाबद्दल माजं भांडन न्हाईच हाय. मला माजं देऊळ का नसावं एवढंच म्या इचारतोय.

**अय्यरः** अचानक इतकी प्रबळ इच्छा?

**कुंभकर्णः** अचानक? इतिहासकारांनी अन् समाजशास्त्रज्ञांनी हजारो वर्षं माज्यावर अन्याय क्येलेला हाय. अन् आता जवा मी माजा रास्त दायाद मागतुया तवा ती अचानक मागनी कशी हुतीया?

**नायरः** त्याचंच आश्चर्य वाटतंय मला.इतक्या  वर्षांच्या शांततेनंतर आत्ता तुला तुझं मंदिर हवंय? स्ट्रेंज...

**कुंभकर्णः** आता माजे डोळे उघडलेत. म्या नीट जागा झालुया.या सबंध मानवजातीला माजं खरं अन् महत्त्वाचं देणं कोनतं ह्ये मला कळून चुकल्यालं हाय.
**(क्षणभर थांबून)** हितं तर रावनबी पुजला जातोय मंग माज्यावरच.....

**अय्यरः** रावणाची गोष्टच वेगळी. तो एक राजा होता.

**कुंभकर्णः** अच्छा..हाच त्यो वर्गभेद माननारा समाज. आलं लक्षात.

**नायरः** हे खोटं आहे. पण ते जाऊदे, आधी हे सांग की आमच्या समाजाला तुझं कोणतं महत्त्वाचं देणं आहे?

**कुंभकर्णः** माजी सततची अन् प्रामाणिक शांतताप्रियता. म्हंजी खरं तर मी आमच्या काळातला पहिला शांतीदूत हाय.

**अय्यरः** **(हसतो)** वा! कॉम्रेड कुंभकर्ण अन् शांतीदूत !

**कुंभकर्णः** हसू नका सर. अन् मला येड्यात बी काढू नका. दिसतं तसं नसतं सगळं. नीट आठवून बघा, मी शूर असून, महापराक्रमी योद्धा असून रामायनातल्या युद्धात माजा किती येळा उल्लेख आलाय? फकस्त दोनदा किंवा तीनदा. अन् त्या युद्धात तरी म्या का उतरलो? कोणीतरी चिथावलं म्हनून किंवा माज्याकडं पर्यायच नव्हता म्हनून.

**नायरः** याचं कारण म्हंजे तू सहा महिन्यांतून एक दिवस जागा असतोस फक्त.

**कुंभकर्णः** ब्रह्म्याचा शाप ! म्या तरी काय करनार त्याला. पन जो मानुस यमाला, साक्षात मृत्युदेवाला युद्धात जिंकतो त्यो मानुस झोपेवर विजय मिळवू शकत नसंल का? केवळ रावनाची युद्धं लढायला लागू नये म्हनून म्या ब्रह्मदेवाचा शाप स्वीकारला असं न्हाई वाटत तुमाला?

**अय्यरः** हा ज्याच्या त्याच्या मताचा प्रश्न आहे.

**कुंभकर्णः** रामायनातल्या ऐन युद्धाच्या प्रसंगात सुद्धा म्या उठल्यानंतर लढायला यायला मुद्दाम उशीर लावला ह्ये कोनाला कळलेलंच न्हाई. अन् मला जवा रामाशी युद्ध करायला सांगितलं तवा म्या काय म्हनालो? आठवा माजे शब्द. त्ये एका शान्तिदूताचे शब्द व्हते.

**नायरः** मला काही आठवत बिठवत नाहीये.

**कुंभकर्णः** असं व्हय...मंग मी तुमाला माजी आय काय म्हनाली त्ये सांगतो.

**अंधार.**

**प्रसंग ११**

**संगीत.**
**प्रकाश.**

**एकाकी आणि काळोख्या रात्रीच्या पार्श्वभूमीवर आई आणि जुळी बहीण आपल्याला दिसतात . (प्रसंग ३ प्रमाणे).**

**कुंभकर्ण (अर्धवट खरा/अर्धवट नाटकातला) त्यांच्या समोर.**

**आईः** न्हाई न्हाई न्हाई ....बाळा हे काय केलंय त्यांनी तुजं...

**जुळी बहीणः** हे काय हाय?

**कुंभकर्णः** वेदना म्हणत्यात याला.

**जुळी बहीणः** पर तुला बगून किती बरं वाटतंय म्हनून सांगू.

**कुंभकर्णः** आये, मला झोप्येतून का उठीवलंस? तुला कशाची इतकी भीती वाटली?

**आईः** माझ्या पराक्रमी पुत्रा, तू इतका काळ झोपेत व्हतास की इथं काय घडलंय अन् मला कां भीती वाटतीया ह्ये तुला म्हाईतच न्हाई. बाळा त्ये घुसलेत. त्यांच्या सैन्यासकट. आपल्या जंगलात. त्यांच्याकड एके-56 हाय, रणगाडे हायेत, शिकारी कुत्री हायेत. आपला अथांग समुद्र ओलांडून वानरसेनेसकट त्ये आत घुसलेत.

**कुंभकर्णः** **(निश्वास सोडतो)** म्हंजी परत युद्ध?

**जुळी बहीणः** व्हय पन तेवढंच न्हाई. आपले कितीतरी असुर मारले ग्येलेत.काही भूमिगत झालेत. जे थांबले त्यांना झाडावर फासावर लटकवलं त्यांनी.

**कुंभकर्णः** अन् त्यांचं किती नुकसान झालंय?

**जुळी बहीणः** फार न्हाई..

**कुंभकर्णः** मग आता?

**(येथे नाटकातील नाटक सुरू होते. यातील संवादांची मुळे रामायणातील आहेत.)**

**आईः** कुंभकर्णा, हे महापराक्रमी योध्या, या संकटातून आमचं निवारण कर. याचसाठी मी तुला निद्रेतून जागा केला. तुला त्यांच्या सेनानायकांचा, विमानांचा नाश करायचा आहे. हे अतिकठीण आव्हान स्वीकार आणि आपल्या लोकांना वेदना आणि यातनांमधून मुक्ती दे. हे महाबाहो, यापूर्वी कधीही घातलं नसेल एवढ्या निर्वाणीने मी तुला साकडं घालते, जा, शत्रूचा निःपात कर आणि विजयी होऊन ये.

**कुंभकर्णः** **(स्मितहास्य करतो.)** अच्छा...तर ज्या गोष्टीचं आपल्याला आणि आपल्या लोकांना भय होतं ती गोष्ट घडलीच अखेर. परंतु असं का घडलं? असं घडलं कारण आपण आपला चांगुलपणा विसरलो. यातल्या प्रमुख पाप्याला तर शासन होईलच परंतु आपल्या सर्वांनादेखील आपल्या दुष्कृत्यांची किंमत मोजावी लागणार, त्याला ईलाज नाही.

**आईः** हे महारथी, तू हे काय बोलतो आहेस? ही राक्षसांची रीत आहे.हे दुष्कृत्य कदापि नाही. तुझे पिता असुर होते. त्यांनी मला विकत घेतलं आणि माझ्याशी विवाह केला. असुर विवाहाची ही रीतच आहे. भूल आणि बलात्कार यांद्वारेच जसा पिशाच्चविवाह संपन्न होतो तसाच राक्षस विवाह अपहरणाद्वारेच संपन्न होतो. ही आपली परंपरा आहे. रावणानं जेव्हा आर्यसम्राज्ञीचं हरण केलं तेव्हा देखील तो आपल्या परंपरेचंच पालन करत होता.

**कुंभकर्णः** पण ह्या परंपरेचा उद्देश आता पूर्णपणे नष्ट झालेला आहे हे आपल्या लोकांना कळायला हवं होतं. अशा क्रूर परंपरा आणखी आणखी राक्षसच जन्माला घालतील नाहीतर काय?

**आईः** मग म्या काय करावं असं वाटतं तुला?सगळे प्रयोग रद्द झालेले हायेत आपले. किती महिने झाले मला सीतेचं काम करू देईना झालेत ते.

**कुंभकर्णः** हे काय मधेच? तू माजी आय हायेस? का कुंभकरनाची आय हायेस का कुंभकर्नाचा भाऊ हायेस? तू द्येवी सीता हायेस का?

**आईः** हा हा हा...माझी अनेक रूपं हायेत बालका...

**कुंभकर्णः** माते, मी काय करावं अशी तुझी अपेक्षा हाये?

**आईः** मला फक्त तुला मंदोदरी आणि विभीषण जे म्हणाले त्याचं स्मरण करून द्यायचं आहे.

**कुंभकर्णः** का म्हणून? कॉम्रेड मंदोदरी आणि कॉम्रेड विभीषणाचं बोलणं मला उपकारक अन् फायदेशीरच वाटतं. हे माते मी तुला विनवणी करतो,आपल्या लोकांना या युद्धात भाग घेण्यापासून परावृत्त कर. हे तुला एक योद्धा सांगत नसून करुणा व प्रेम यांनी भारलेला पुत्र सांगत आहे. अजूनही वेळ गेलेली नाही जननी. तू ज्या सर्व शास्त्रांत पारंगत आहेस ती शास्त्रं देखील हेच सांगत नाहीत काय? शांततेच्या निवडीत कधीच कोणताही अपमान नसतो...शांतता म्हणजे मानहानी देखील नव्हे. असो. मला जे वाटलं ते माझं सांगून झालेलं आहे. यापुढील निर्णय तू घ्यायचा आहेस. इथून पुढे मी तुझा नम्र सेवक असेन. आज्ञा कर माते.

**आईः** तू एक राक्षस आहेस आणि युद्ध हाच तुझा धर्म आहे. तेव्हा मी तुला आज्ञा करते, जा आणि आपल्या शत्रूचा नाश कर.

**(कोलाहल इत्यादी..)**

**(पुन्हा वास्तवात.)**

**[विराम.]**

**जुळी बहीणः** आनि कुंभकर्न मारला ग्येला.

**आईः** टाय घातलेल्या दोन अनोळखी लोकांकडून.तू म्हनाली व्हतीस तसंच झालं.

**[विराम.]**

**जुळी बहीणः** कुंभकर्न मारला ग्येला. श्री रामानं इंद्राच्या साथीनं त्येला मारला का लक्षुमनानं ब्रह्मास्त्रानं मारला.. श्री राम का लक्षुमन.. लक्षुमन का श्री राम.. इंद्र का ब्रह्मास्त्र.. ब्रह्मास्त्र का इंद्र.. मरनं आनी जगनं.. जगनं अन् झोपनं.. चूक का बरोबर. या सगळ्याची उच्चस्तरीय चौकशी चालू हाय.. पर यातून खरं भाईर येईल? मज्जा.. सगळीच मज्जा....

**(संगीत.)**

**अंधार.**

**प्रसंग १२**

**जगाच्या कुठल्यातरी दुसऱ्या भागात असलेले- अय्यर आणि नायर.**

**अय्यर व नायरः** विजयस्तु विजयस्तु...तुमचा विजय असो..आपला विजय असो...

**मॅडम एक्सः** अभिनंदन ! कॉम्रेड कुंभकर्णाचा बिमोड झाला. तो समूळ नष्ट झाला. आपली मोहीम प्रचंड यशस्वी झाली. आजच्या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी राष्ट्रीय सुटी घेतली जाईल. अय्यर आणि नायर तुम्ही आमचे हिरो आहात. पुन्हा एकवार अभिनंदन!

**अय्यरः** धन्यवाद मॅडम. आमच्या प्रमोशनचं तेवढं...बरेच दिवस लांबत गेलंय...

**नायरः** खरं म्हणजे पगारवाढ...! कॉम्रेड कुंभकर्णाच्या गावात ४०० एकर जमीन....

**मॅडम एक्सः** सभ्य गृहस्थहो, आपण या कार्याला तुच्छ आर्थिक पातळीवर आणणं योग्य ठरणार नाही. आपला हा लढा काही विशिष्ट हेतूंकरता आहे. आपण जरी उत्पादनाच्या धंद्यात असलो तरी आपलं काम ही एक सामाजिक कृती आहे. व्यक्तिगत फायदा आणि क्षुद्र

हाव ह्यांना यात स्थान नाही. आपण सर्वमान्य कल्पना, सर्वमान्य मूल्यं, सर्वमान्य कायदे, सर्वमान्य जीवनपद्धती यांचा पुरस्कार केला पाहिजे. आपले राष्ट्र, आपला धर्म, आपली अर्थव्यवस्था आणि आपले लोकं यांच्यासाठी आपण शक्य ती प्रत्येक गोष्ट केली पाहिजे. कळलं मि. अय्यर आणि मि. नायर?

**अय्यरः** होय मॅडम!

**नायरः** होय मॅडम !

**मॅडम एक्सः** मि. अय्यर आणि मि. नायर काळजी करू नका. एक ना एक दिवस तुम्ही दोघेही मॅडम एक्स होणार आहात. तुम्ही राष्ट्रीय शत्रूचा नाश केलात हे आम्ही विसरणार नाही.

**अय्यर व नायरः** थॅंक्यू मॅडम एक्स! थॅंक्यू वेरी मच मॅडम एक्स !

**मॅडम एक्सः** मि. अय्यर आणि मि.नायर बाहेर टॅक्सी तुमची वाट पहाते आहे. या आता. वन, टू, थ्री....गो !

**(अय्यर आणि नायर चपळाईने निघून जातात.)**

**मॅडम एक्सः** या विदूषकांचा लवकरात लवकर बंदोबस्त केला पाहिजे. त्यांना फार गोष्टी माहीत झालेल्या आहेत. थॅंक गॉड, माणसाला युक्तीवादापेक्षा भूक महत्त्वाची असते, नाहीतर....

**अंधार.**

**प्रसंग १३**

**समारोप.**
**जुळी बहीण.**

**जुळी बहीण (बसून पत्र लिहिते आहे)**

प्रिय भाऊ!

ही माजी आत्महत्या करन्याआधीची शेवटची चिठ्ठी हाय.

भाऊ, तुजे शेवटचे शब्द आठवतात मला.

तू म्हनाला व्हतासः “आठवतं का आक्की? आपला बाबा सरकारसाटी काम करायचा. आंबेडकर, थीवर, इमन्युएल शेखरन यांच्या पुतळ्यांभवती लोखंडी कुंपण घालनं ह्ये त्येचं काम व्हतं.”

म्या म्हनाले व्हय.

तू म्हनालासः “म्येलेल्या मानसांच्या पुतळ्यांना बी लोखंडी तुरुंगात ठ्येवावं लागतं हितं. हा असला कसला द्येश हाय?”

बास यवडंच.

मंग तू म्येलासच.

हितलं काय सांगू? आपलं गाव उध्वस्त झालं. कायबी उरलं न्हाई मागं.

या सगळ्या भयानक प्रकाराला आता वर्ष झालं. आपल्या पान्यात त्यांनी कीटकनाशकं भरून भरून वतली. पान्याची चवच बदलली. पानी आता पूर्वीसारखं लागत न्हाई. पन तरीबी आमी त्ये पितो. विजेची सगळी उपकर्ण त्यांनी लुटून न्येली. गावातल्या साळंला

टाळं लागल्यालं हाय. सरकार विधवांची अन् अनाथांची काळजी घेतं, पन गावात कुनी विधवा न्हाईच ना कुनी अनाथ. त्यामुळं काही प्रश्नच न्हाई.

तू म्येल्यानंतर झालेली आनखी एक चांगली गोष्ट म्हंजी, कुनीबी दुःखात बुडून ग्येलं न्हाई.

आपला तालुका हाय तस्साच हाय. घाणेरडा अन् भकास.

तुला आपलं घर आठवतं का? आपलं यका खोलीचं घर?

एक बी धडकी गोष्ट न्हाई.

सगळं तुटकं, फुटकं, फाटकं. अन् सगळ्यावर झालेली लाल धूळ.

आईची जगन्याची लढाई किती भयानक.

त्यो मेकप, त्ये नाटक, सतत काम, कर्जदार, म्यानेजर, रंडीबाजी....

ती आता शीतेचं काम न्हाई करत. “येक्कावन्न वर्षं सीतेचं काम करून मला कंटाळा आला”, असं म्हनती ती.

हल्ली आई शूर्पनखेचं काम करती.

ह्ये कळल्यावर बाबा खुश व्हील. आई पन आनंदात हाये.

पोटदुखी, गळवं, चुरचुरते डोळे, गळणारं क्येस असं सगळं असूनही ती आनंदात हाय. गोष्टी कशा संपून जातात न्हाई?

न्हाई?

मधी काळ्या शर्टाबद्दल परत बोलनं सुरू झालं. सगळ्या गावात त्यांनी काळे झेंडे लावले. आपल्या घरावरपन हाय काळा फाटका झेंडा. निस्ती प्रतीकं सगळी. कशाचाच अन् कुनाचाच आत्मसन्मान उरलेला न्हाई.

ग्येल्या आठवड्यात माजी पोलीसचौकशी झाली. त्यांनी मला लय शिव्या दिल्या. माज्यावरून सारखे हात फिरवत व्हते. जाताना मला अंगारा दिला अन् म्हनाले “जा.ह्यो अंगारा तुला सुद्ध करंल. जा.”

यवडंच आठवतया मला.

माज्या आठवणींना लकवा मारला हाय. मला प्रश्न विचारले का मी गप व्हते. नायतर झोपून जाते.
झोपल्यामुळं येळ छान जातो.

झोप.

म्हनूनच तुज्या बिछान्याची प्रतिकृती तयार केलीया. आता तुजा बिछाना गावातलं स्मारक झालाय.
त्याला बी लोखंडी कुंपण हायेच.

समद्या गावाला झोपाया लय आवडतं.

मला बी.

म्या झोपते; कोडग्यागत सहा म्हन्ने झोपते म्या.

पर कदीकदी लय वाईट सप्नं पडत्यात. सैरावैरा पळणारे उंदीर, घोंगावनाऱ्या माश्या, घाणेरड्या सुरकुतलेल्या भाज्या, गढूळ पानी, सडल्याचा अन् कुजल्याचा वास असं कायकाय सपनात येतं माज्या.

हितं संध्याकाळ झालेली हाय अन् दिवे न्हाईत.माजी शिसपेन्सिल बी बोथट झालीया. पर अजून कितीतरी सांगायचं हाय. कितीतरी. येक दिवस म्या तुला माजी गोष्ट सांगन.

जरा वेगळी असन ती.

जाऊदे, वेळ अन् कागुद संपत आलेत. पुरं झालं यवड. म्या निरोप घेते आता तुजा.

येते रे माज्या भावा. कुंभकर्णा. कॉम्रेड कुंभकर्णा. येते.

**समाप्त.**